# आधुनिक केसरी

गुरुवार, २४ नोव्हेंबर २०२२
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१०३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 24 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-103 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5


# धर्मांतरबंदी-लव्ह जिहादविरोधी कायदा करा

## आळंदीतील 16 व्या वारकरी महाअधिवेशनात एकमुखी मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**आळंदी : मुलींवर चांगले संस्कार केल्यास आणि त्यांना धर्मशिक्षण दिल्यास त्या लव्ह जिहादाला बळी पडणार नाहीत. स्वतःची मुले काय करतात, याकडे पालकांनी लक्ष द्यायला हवे. इंग्रजांनी वैदीक सनातन शिक्षण व्यवस्था मोडून मॅकोले शिक्षण व्यवस्था चालू केली, तसेच भारतात वर्णद्वेष चालू केला. त्यामुळे हिंदूंनी पक्ष आणि जाती यांमध्ये न अडकता भारतीय म्हणून संघटित झाले पाहिजे. हिंदूंनी धर्माविषयी चर्चा करायला हवी, असे प्रतिपादन पू. श्री अमृताश्रम स्वामी महाराज (दंडी स्वामी) यांनी येथे आयोजित केलेल्या वारकरी महाअधिवेशनात केले. या अधि वेशनात महाराष्ट्रात धर्मांतरबंदी-लव्ह जिहादविरोधी कायदा करावा, अशी एकमुखी मागणी करण्यात आली.**



आळंदी येथे श्री देविदास धर्मशाळा तथा वै. मामासाहेब दांडेकर स्मृती मंदिर, गोपाळपुरा येथे श्री संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त राष्ट्रीय वारकरी परिषद आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भव्य राज्यव्यापी सोळावे वारकरी महाअधिवेशन' उत्साही आणि भावपूर्ण वातावरणात पार पडले. या अधिवेशनाला सहस्रों वारकऱ्यांची उपस्थिती होती. या अधिवेशनात महाराष्ट्रात धर्मांतरबंदी कायदा आणि लव्ह जिहादविरोधी कायदा करण्यात यावा,गड आणि दुर्ग यांवरील अतिक्रमणे त्वरित हटवावी अशी वारकऱ्यांनी एकमुखी मागणी केली.

**या अधिवेशनात संमत करण्यात आलेले महत्वपूर्ण ठराव :** सर्व तीर्थक्षेत्री मद्य आणि मांस विक्रीवर बंदी घालावी, पंढरपूर येथील चंद्रभागा आणि आळंदी येथील इंद्रांयणी नदीत सांडपाणी सोडण्यास बंदी घालावी, सर्व मंदिरे सरकारच्या कह्यातून मुक्त करावीत, बियरबार, मटण दुकानांना देवता आणि गडकोटांची नावे देऊ नयेत, महाराष्ट्रात गोसंवर्धन आयोगाची स्थापना करण्यात यावी, हलाल शिक्का असलेल्या उत्पादनांवर बहिष्कार घालावा, यांसह 16 ठराव संमत करण्यात आले.महाअधिवेशनात झालेल्या ठरावांचे निवेदन तयार करून वारकऱ्यांच्या वतीने ते मुख्यमंत्र्यांना देण्यात येणार आहे. या अधिवेशनात बोलताना ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ म्हणाले की, हिंदूवरील आघातांच्या विरोधात हिंदू जागृत झाला पाहिजे, गोहत्या बंदी कायदा झालाच पाहिजे. गोरक्षकांच्या पाठीशी उभे राहून हिंदूंनी स्वतःची ताकद दाखवून दिली पाहिजे. पू. श्री द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदासजी महाराज लहवितकर म्हणाले की, कीर्तनकारांनी संप्रदायाची आचारसंहिता बाळगून कीर्तनातून धर्माचे ज्ञान दिले पाहिजे. शालेय अभ्यासक्रमात संत आणि धर्मशास्त्र अभ्यासक्रमाचा समावेश केला पाहिजे. हिंदु भूषण श्री श्यामजी महाराज म्हणाले की, पालघर जिल्ह्यातील गडचिंचले गावात साधूंची हत्या करणाऱ्यांना शिक्षा करायला हवी. हिंदु धर्म आणि हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात हिंदूंची संघटित होऊन विरोध केला पाहिजे. योगीदत्तनाथ महाराज म्हणाले की, कीर्तनकारांनी हिंदु देवता, धर्म आणि वाङमय यांचे शिक्षण देऊन हिंदूंना जागृत करावे. हिंदु देवतांचे विडंबन आणि टीका करणाऱ्यांना कडाडून विरोध करावा. कीर्तनातून कीर्तनकरांनी हिंदु धर्म आणि हिंदू यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांची माहिती दिली पाहिजे. वैकुंठवासी वक्ते बाबा यांचे सुपुत्र ह. भ. प. गोपाळ महाराज वक्ते तसेच राष्ट्रीय वारकरी परिषदेचे अध्यक्ष ह. भ. प. मारुती महाराज तुनतूने शास्त्री ह. भ. प. भगवान महाराज कोकरे इत्यादी अनेक वारकरी वक्त्यांनी हिंदू धर्मातील विटंबना बाबत वारकरी अधिवेशनात आपले विचार प्रस्तुत केले. मिलिंद एकबोटे आणि विजय वरुडकर यांचेही मार्गदर्शन उपस्थितांना लाभले. हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्यांचे संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले की, शासनाने सर्वच गडदुर्गांवर झालेले इस्लामी अतिक्रमण हटवले पाहिजे. सर्व हिंदूंनी हलाल उत्पादनांवर बहिष्कार टाकून हलाल जिहाद आणि उत्पादने ही देशातून हद्दपार करण्यासाठी संघटित होणे आवश्यक आहे, तसेच लव्ह जिहाद, गोहत्या बंदी, वक्फ बोर्ड कायदा, धर्मांतर असे हिंदु धर्मावर होणारे आघात रोखायला हवेत. हिंदु धर्माचे रक्षण होण्यासाठी हिंदूंनी हिंदु राष्ट्र स्थापनेसाठी कृतीशील होऊन प्रयत्न करावेत. या वेळी अधिवेशनात कृतीशील असणाऱ्या राष्ट्रीय वारकरी परिषदेच्या नगर जिल्ह्यातील सदस्यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. ह भ प निरंजन शास्त्री कोठेकर महाराज आळंदी अध्यक्ष देविदास धर्मशाळा यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय वारकरी परिषदेची उत्कृष्ट कृतीशील जिल्हा समिती म्हणून नगर जिल्ह्याचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन ह.भ.प. अरुणमहाराज पिंपळे आणि ह.भ.प. निवृत्ती महाराज हल्लाळीकर यांनी केले. अधिवेशनाची सांगता पसायदानाने झाली.

# महाराष्ट्रातील एकही गाव कर्नाटकात जाणार नाही!

## देवेंद्र फडणवीस : बेळगाव-कारवार-निपाणीसह आमची गावे मिळविण्यासाठी सुप्रीम कोर्टात लढणार

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** महाराष्ट्रातील एकही गाव कर्नाटकात जाणार नाही. बेळगाव-कारवार-निपाणीसह मराठी भाषिकांची गावे मिळविण्यासाठी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात भक्कमपणे लढा देईल, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे केले. सांगली जिल्ह्याच्या जत तालुक्यातील काही गावांच्या संदर्भात कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यावर माध्यमांनी प्रतिक्रिया विचारली असता ते बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जत तालुक्यातील ज्या गावांनी ठराव केला, तो 2012 मधील आहे. नव्याने कोणताही ठराव कोणत्याही गावांनी केलेला नाही. त्या गावांना पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी होत्या. आपले सरकार राज्यात असताना कर्नाटकला जेथे पाणी हवे तेथे त्यांना ते घ्यावे आणि आपल्या गावांना जेथे पाणी हवे, ते कर्नाटकने द्यावे, असा निर्णय झाला होता. त्यानंतर म्हैसाळच्या सुधारित योजनेत त्यांचा समावेश करण्याचा निर्णय तत्कालिन मंत्री गिरीश महाजन यांनी घेतला होता. तशी योजना सुद्धा तयार झाली होती. गेल्या सरकारला कोविडमुळे त्या योजनेला मान्यता देता आली नसेल. पण, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आमचे सरकार त्याला तत्काळ मान्यता देईल. या सर्व योजनांना केंद्र सरकारने पैसा दिला आहे. त्यामुळे पैशाची कुठेही कमतरता नाही. या गावांनी नव्याने आता कुठलीही मागणी केली नाही. 2012 ची ही जुनी बाब आहे.

सीमाप्रश्नी आपल्या मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतल्यानंतर आणि त्यात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतल्यामुळे कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी अशी वक्तव्ये केली असतील. एक नक्की सांगतो की, आम्ही सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू भक्कमपणे मांडून बेळगाव-कारवार-निपाणीसह आमची गावे मिळविण्याचा प्रयत्न करणार आहोत. आपण एकाच देशात राहतो. त्यामुळे शत्रूत्त्व नसले तरी कायदेशीर लढा मात्र आहेच. एकत्रित बैठका घेऊन प्रश्न सुटणार असतील, सिंचनाचे विषय मार्गी लागणार असतील तर अशा बैठका व्हायलाच हव्या, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

श्रद्धा वालकर हिने 2020 मध्ये लिहिलेल्या पत्रासंदर्भात पत्रकारांनी विचारले असता, देवेंद्र फडणवीस म्हणाले की, श्रद्धाचे पत्र मी पाहिले. त्या पत्रावर कारवाई का झाली नाही, याचा तपास केला जाईल. या पत्रावर वेळेत कारवाई झाली असती तर कदाचित आज श्रद्धाचे प्राण वाचू शकले असते.

# मच्छीमाराला सापडला ३१ किलोचा गोल्ड फिश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जगातील सर्वात मोठ्या गोल्ड फिशपैकी एक समजला जाणारा ३१ किलोचा मासा एका मच्छीमाराला मासेमारी करताना पाण्यात सापडला. ब्रिटनमध्ये राहणाऱ्या एका मच्छीमाराने हा गोल्ड फिश शर्थीचे प्रयत्न करुन पाण्यात शोधला. जवळपास २० वर्षांपूर्वी हा गोल्ड फिश पाण्यात सोडण्यात आला होता. गोल्ड फिश समुद्रात किंवा तलावाच्या पाण्यात क्वचितच आढळतो. त्यामुळे याला जादुई गोल्ड फिश असे म्हटले जाते. एका मच्छीमाराने नारंगी रंगाचा गोल्ड फिश पकडला. २० वर्षांपूर्वी या माशाला पाण्यात सोडण्यात आले होते. त्यानंतर हा मासा पाण्यात क्वचितच दिसायचा. एका फिशरी मॅनेजरने सांगितले की, या गोल्ड फिशचे आरोग्य आजही ठणठणीत आहे. हा मासा जगातील सर्वात मोठ्या गोल्ड फिशपैकी एक आहे, असा दावा केला जात आहे. या माशाला पकडण्यासाठी एंडी हैकेटने जवळपास २५ मिनिटे पाण्यात शोध घेतला. कॅरट नावाच्या या गोल्ड फिशला पकडल्यानंतर पुन्हा त्याला पाण्यात सोडण्यात आले. हायब्रिड प्रजातीचा हा मासा खूप आकर्षक आहे.

# महिला जवान गायत्रीचे मृत्यूनंतरही दुर्दैवाचे दशावतार

## प्रोटोकॉल नसल्याचे कारण दाखवत शासकीय यंत्रणेने फिरवली पाठ


आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** सीमा सुरक्षा दलात ५६ बटालियन मध्ये कार्यरत असणारी देवगाव ता.निफाड येथील कु.गायत्री विठ्ठल जाधव (वय २३) हिच्यावर आज दि.२३ शोकाकुल वातावरणात ग्रामपंचायत प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले. सीमा सुरक्षा दलात कार्यरत असतांना अपघात झाल्यामुळे दीर्घ आजाराने गायत्रीने काल या जगाचा निरोप घेतला. गायत्रीचे शवविच्छेदन केल्यानंतर निफाड येथून गायत्रीचे पार्थिव गावात येताच सजवलेल्या रथातून गायत्रीची अंत्ययात्रा काढण्यात आली. अंत्ययात्रेत, 'ए मेरे वतन के लोगो जरा याद करो कुर्बानी' या गीताची धून व 'गायत्री अमर रहे अमर रहे' साश्रु नयनांनी नागरिकांकडून घोषणा देण्यात आल्या. गायत्रीला अखेरचा निरोप देण्यासाठी हजारोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. अंत्यदर्शनप्रसंगी आई, वडील व बहिणी यांनी हंबरडा फोडताच उपस्थित संपूर्ण जनसागर हेलवला. ग्रामपंचायत प्रांगणात अंत्ययात्रा येताच कुठलाही शासकीय प्रोटोकॉल प्राप्त नसल्यामुळे मंडळ अधिकारी, तलाठी यांनी केवळ अंतिम दर्शन घेत शासकीय यंत्रणेने तिच्या अंत्यसंस्काराकडे पाठ फिरवली. शासकीय यंत्रणेने असंवेदनशीलता दाखवली मात्र, लासलगाव येथील पार्थ अकादमी व जळगाव नेऊर येथील लक्ष अकादमीचे सैन्यात कार्यरत असणारे व सध्या रजेवर असणाऱ्या योगेश धाकराव, ज्ञानेश्वर धाकराव, कलीम शेख, मोसीन पठाण, अजय मुलाणी, किसन गांगुर्डे, हवालदार महेश वाघ या जवानांनी मानवंदना दिली. गायत्रीचा मामेभाऊ हृषीकेश गणेश कोकणे याने अग्निडाग दिला. याप्रसंगी मा.पं.स सदस्य भाऊसाहेब बोचरे,मा. सरपंच विनोद जोशी, मा.सरपंच शिवाजी सुपनर, विशाल लहरे, पार्थ अकादमीचे भाऊसाहेब लोणारी, बाबासाहेब आवारे, लक्ष अकादमीची विद्यार्थिनी प्रांजल वाघ यांनी शब्दसुमनांनी श्रद्धांजली वाहिली.



याप्रसंगी सरपंच वैशाली अढागळे, उपसरपंच लहानु मेमाणे, पो.पा.सुनिल बोचरे, लक्ष अकादमी जळगाव नेऊरचे संचालक आनंद गुंड, पार्थ अकादमी आंबेगाव, मंडळ अधिकारी डी.डी. पगार, वैद्यकीय अधिकारी डॉ.राहुल गोलाईत, तलाठी दीपक किरडे, ग्रामविकास अधिकारी प्रवीण उगले, प्राचार्य बी.व्ही. कडलग, सतीश लोहारकर, शांताराम जाधव, भागवत बोचरे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

पण मुंबईला असलेली महागाई आणि नितीनला असलेला कमी पगार यामुळे दोघांची ओढाताण होऊ लागली. घर चालवणे कठीण होऊ लागले. एक दिवस रेश्मा नितीनला म्हणाली, अहो, मी सुद्धा काही काम करून आपल्या संसाराला हातभार लावावा असे म्हणते. ' नितीन म्हणाला, ' हरकत नाही. पण तू काय काम करणार ? इकडे तुला चांगली नोकरी मिळेल याची खात्री नाही. मी इंजिनिअर असूनही कमी पगारावर काम करतो आहे. ' रेश्मा म्हणाली, ' तुम्ही नेहमी म्हणता ना, की तुझ्या हाताला चव आहे म्हणून. मग मी स्वयंपाकाच्या ऑर्डरी घेत जाईन. लोकांच्या मागणीप्रमाणे त्यांना हवे ते पदार्थ बनवून देईन. आणि एकदा नाव झाले की हळूहळू कामे मिळत जातील. 'नितीन म्हणाला, ' पण तू स्वयंपाकाचे काम करणार ? मला योग्य नाही वाटत.' रेश्मा म्हणाली, ' काय हरकत आहे ? कामात कसली आली आहे लाज ? कोणतेही काम सुरुवातीला छोटे वाटते पण एकदा सुरुवात झाली की

## स्वामीकृपा



हळूहळू काम वाढत जाते. आपलं काम चांगलं असलं की लोकांचा विश्वास वाढायला लागतो. व्यवसाय नावारूपाला येतो.' नितीन म्हणाला, ' ठीक आहे. तुला योग्य वाटेल तसे कर. रेश्माने स्थानिक वर्तमानपत्रातून आपल्या या छोट्या व्यवसायाची जाहिरात केली. घराच्या बाहेर बोर्ड लावला. एक नवी आशा , नवा हुरूप तिला मिळाला. जाहिरात करून काही दिवस होऊन गेले पण अजून म्हणावे तसे काम मिळत नव्हते. रेश्माच्या घराजवळच रंजनाताईंचा बंगला होता. तिथे सकाळी, संध्याकाळी काही मंडळी जाताना दिसत. रेश्माने त्याबद्दल लोकांना विचारले तेव्हा तिला कळले की त्याच बंगल्यात स्वामी समर्थांची एक मोठी प्रतिमा ठेवलेली असून लोक त्याठिकाणी त्यांची भक्ती करण्यासाठी, दर्शन घेण्यासाठी जातात. सकाळ, संध्याकाळ स्वामींची पूजा, आराधना, नैवेद्य, आरती आदी सोपस्कार होतात. रेश्माला हा शुभशकुन वाटला. आपल्या घराजवळ स्वामी समर्थांचा निवास आहे, ही गोष्ट तिला खूपच आनंद आणि समाधान देणारी ठरली. त्या दिवशी संध्याकाळी ती दर्शनासाठी तेथे जाऊन आली. तेथे खूपच प्रसन्न वाटले. **क्रमशः**



## आनंदी पहाट

### मानसिक एकलेपणा दूर होणे गरजेचे

आधुनिक केसरी

जोपर्यंत काही घडत आहे, तो पर्यंत सर्व ठीक आहे; पण जेव्हा काही बिघडेल तेव्हा मात्र निस्तरणे मुश्कील ठरू शकते. ह्याची जाणीव आपल्याला होणे अधिक महत्वाचे आहे. कित्येकदा, ह्या आठवणीच आपल्या मनाला उभारी देत असतात. आपला मानसिक एकलेपणा दूर करण्याच्या कामी येतात. आपण शरीराने एका वेळेला एकाच ठिकाणी जाऊ शकतो, पण गत काळातल्या आठवणी मात्र आपल्याला अनेक ठिकाणांची सफर करवून आणतात. आठवणी ह्या मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे असतात. आठवणींचेही तसेच आहे. साठवणीतल्या अशा अनेक आठवणी आपल्या मनांत घर करून रहात असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आठवणीतला एखादा क्षण जरी आपल्याला आठवला तरी तो संपूर्ण दिवस विलक्षण करत जातो. ह्या आठवणीच आपापल्या परस्परांतील नात्याची वीण घट्ट करत जातात. आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. भूतकाळाचे भूतच जणू काही आपल्या मनाचा ताबा घेऊन सर्वत्र टेंभा मिरवत असते. वर्तमानातल्या "मी" चा त्यामुळेच आपल्याला विसर पडलेला असतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे? आणि ते सुद्धा का? ह्याचा प्रकर्षाने आणि प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणे आवश्यक आणि म्हणूनच महत्वाचे असते.



आधुनिक केसरी

### नाही आता कैसी । अभिलाषा ।।

पूर्व पुण्य सारे । आज फळा आले ।।
याचक ते झाले । तुझ्या दारी ।। १ ।।
पितृछाया देई । सोन्याचा पींपळ ।।
झालो सर्वकाळ ।। निश्चिंत मी ।। २ ।।
शब्द पान्हा सोडी । कृपाळू माऊली ।।
नेत्री या दाटली । इंद्रायणी ।। ३ ।।
न कळे मजला । वेद-शास्त्र काही ।।
तूच मार्ग दावी । लेकराला ।। ४ ।।
पदरी घे माझी ।। सारी चूक-भूल ।।
अडाणी मी मुल । तार ज्ञाना ।। ५ ।।
घेईन विसावा । तुझ्या चरणाशी ।।
नाही आता कैसी । अभिलाषा ।। ६ ।।



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”

आधुनिक केसरी

### अंबानाम-महात्म्य


वाचता नाम वाचवे रे नाम।
नामाचा करावा आपण नेम।
प्रेम सप्रेम जीवन आनन्द।
भक्तीच्या कल्लोळे तरंग मंद।
अंबेच्या कृपेने सहज तरणे।
सुरथादि घ्यावे उदाहरणे।
ऐसिया भक्तांचे दास मी व्हावे।
हीच एक आस चंद्रहासमने।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## काव्य-चरितावली

### मळा विठोबाचा



आधुनिक केसरी

श्रीमहाराजांची माता-पितरें
स्मरण करूया त्यांचे आदरे
पंत आजोबा वयोमाने थकले
त्यांनी पंढरीनाथास प्रथिले ।। १ ।।

मळ्यात पंतासंगे जन जमले
खोदल्या खड्ड्यात देव सापडले
सगळ्यांना सुंदर मूर्तीरूपात ते
विठोबा- रुखमाई दर्शन जाहले ।। २ ।।

शुभ मुहूर्तावरी देव स्थापन केले
अन्नदान,भजन,कीर्तन सोहोळे झाले
विहीर विठोबाची,मळा विठोबाचा
भावभक्तीचे स्थान नाव ख्यात झाले ।। ३ ।।

श्रीगुरुकृपेचा साराच हा महिमा
कवी अरुणदासा लाभे लेखनभान
लेखना मिळे प्रेरणा आपोआप
शब्दाक्षरे प्रकटती शोभायमान ।।४ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

***महा भक्त प्रल्हाद हा कष्टवीला।***
***म्हणोनी तयाकारणे सिंह जाला।***
***न ये ज्वाळ वीशाळ संन्नीध कोण्ही।***
***नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी।।१२१।।***

**श्लोकार्थ :** प्रल्हाद हा देवाचा मोठा भक्त अतिशय त्रासात होता. तेव्हा त्याच्यासाठी म्हणून देवाने नृसिंहाचे रूप घेतले आणि प्रल्हादाचे रक्षण केले. नृसिंहाच्या अक्राळविक्राळ रूपाचा दाह इतका होता की त्याच्याजवळ कोणीही जाऊ शकत नव्हते. भक्ताविषयी अभिमान बाळगणारा देव भक्ताची उपेक्षा कधीच करत नाही.

**भावार्थ :** तिसऱ्या वराह अवतारात श्रीविष्णूने मारलेल्या हिरण्याक्ष या असुराचा भाऊ हिरण्यकश्यपु हा आपल्या भावाचा देवानी वध केला हे पाहून अतिशय संतापला. सूड घेण्यासाठी आपण सर्वात बलशाली, अजेय, अमर व्हायचं या इच्छेने तसा वर मिळावा म्हणून त्यानं ब्रम्हदेवाची प्रार्थना आणि त्यासाठी घोर तपश्चर्या करायला सुरुवात केली. या तपश्चर्येत तो मग्न असताना देवांनी असुरांवर हल्ला करून त्यांचा पराभव केला. सारे असुर त्यांनी बळकावलेले स्वर्गाचे राज्य सोडून पळून गेले. तेव्हा हिरण्यकश्यपूची पत्नी कयाधु आणि पुत्र प्रल्हाद यांना इंद्र पकडून नेणार होता. पण देवर्षी नारदांनी त्यांना अभय देऊन आपल्या आश्रमात आश्रय दिला. नारद स्वतः श्रीविष्णूचे निस्सीम भक्त. त्यामुळे त्यांच्या आश्रमातील वास्तव्यात तेथे चालणाऱ्या विष्णूभक्तीमुळे बाल प्रल्हादाच्या मनावरहि परिणाम होऊन तोदेखील विष्णूचा भक्त, उपासक बनला. हिरण्यकश्यपूचे तप पूर्ण झाल्यावर प्रसन्न झालेल्या ब्रम्हदेवानी त्याला हवा असलेला वर दिला. या वरामुळे हिरण्यकश्यपूला देव, दानव, मानव आणि पशु यांपैकी कोणीहि, दिवसा किंवा रात्री, शस्त्रांनी किंवा अस्त्रांनी, वास्तूमध्ये किंवा बाहेर, जमिनीवर, पाण्यात किंवा आकाशात मारू शकणार नव्हते. या वरदानामुळे हिरण्यकशपु आणखीच उन्मत्त बनला. त्याने पुन्हा स्वर्गलोकावर ताबा मिळवला आणि अत्याचार सुरु केले. विष्णूवरचा राग तो विसरला नव्हता, उलट तो जास्तीच खदखदत राहिला. अशा परिस्थितीत त्याचा स्वतःचा पुत्र प्रल्हाद हा विष्णूची भक्ती करतो आहे, श्रीहरी, श्रीहरी असे त्याचे नाम सतत घेत आहे यामुळे तर तो आणखीच भडकला आणि हर प्रकारे प्रल्हादाला मारायचा प्रयत्न करू लागला. त्याला श्वापदांपुढे फेकले पण ती श्वापदे प्रल्हादाला काही इजा न करता दूर निघून गेली, त्याला उकळत्या तेलात फेकले पण ते तेलच थंड झाले आणि प्रल्हादाला काही अपाय झाला नाही. इतकेच काय पण प्रल्हादाला अग्नीत जाळून टाकायची आज्ञा हिण्यकश्यपूने आपली बहीण होलिका हिला दिली. पण प्रल्हादाचा स्पर्श होताच होलिकाग्नीच्या ज्वालादेखील विझल्या. या सगळ्या प्रसंगांत भक्त प्रल्हाद मुखाने केवळ श्रीहरी, श्रीहरी असे नाम घेत शांत अविचलित राहिला होता. हे सर्व पाहून हिरण्यकश्यपु वेडापिसा झाला आणि त्याने क्रोधाने प्रल्हादाला विचारले, “कोण आहे हा तुझा हरी? बोल, कुठे आहे तो? येऊ दे माझ्यासमोर, मारून टाकेन मी त्याला.” प्रल्हाद म्हणाला, “माझा हरी इथे, तिथे, सगळीकडे, अणुरेणू व्यापून राहिला आहे.” यावर हिरण्यकश्यपूने समोरच्या दगडी खांबाकडे बोट दाखवून विचारले, “असं? या खांबात आहे तो?” प्रल्हादाने हो म्हणताच हिरण्यकश्यपूने खांबाला लाथ मारली. त्यासरशी तो खांब दुभंगला आणि त्यातून घनघोर गर्जना करत भयंकर दिसणारी आकृती बाहेर पडली. तिचे शरीर माणसाचे होते पण तोंड सिंहाचे, तोंडात कराल दाढा, लाल लाल जीभ, तर लांब अणकुचीदार नखे असलेले बलिष्ठ हात असे ते अक्राळविक्राळ दिसणारे रूप गर्जना करून म्हणाले, “हो मीच प्रल्हादाचा हरी आहे आणि तुझा वध करायला आलो आहे.’ उन्मत्त हिरण्यकश्यपु मोठ्याने हसून म्हणाला, “तूच काय कोणीच मला मारू शकणार नाही. ब्रम्हदेवाने वरदान दिले आहे मला. देव, दानव, मानव, पशु यांपैकी कोणीहि, दिवसा किंवा रात्री, शस्त्रांनी किंवा अस्त्रांनी, वास्तूमध्ये किंवा बाहेर,जमिनीवर, पाण्यात किंवा आकाशात मला मारू शकणार नाही.” यावर श्रीहरी म्हणाले. नीट डोळे उघडून बघ, मी ना पशु आहे ना मानव, मी नृसिंह आहे आणि माझ्याकडे कोणतेहि शस्त्र, अस्त्र नाही पण तरीहि तुझा नाश मी करणार आहे, इथे, या क्षणी. आत्ताचा क्षण म्हणजे दिवस नाही नि रात्रही नाही, संध्याकाळ आहे.” असे म्हणून नृसिंहाने हिरण्यकश्यपूला धरले आणि ना वाड्यात, ना बाहेर असा उंबरठ्यावर बसून, ना जमिनीवर, ना हवेत, म्हणून मांडीवर ठेऊन, हाताच्या नख्यांनी छाती फाडून त्याचा अंत केला. यावेळी नृसिंहाचा क्रोध इतका पराकोटीला गेला होता की त्याच्या त्या अक्राळविक्राळ, गर्जना करत असलेल्या मुखाकडे पाहण्याचेही कोणाला धाडस होत नव्हते मग जवळ जाणे तर दूरच. सिंहाची जशी त्याच्या बछड्याला भीती वाटत नाही, अगदी तसेच प्रल्हादाचे झाले. भक्त प्रल्हाद घाबरले नाहीत. भक्त प्रल्हादांनी भागवतांचे चरण पकडले. त्यांनी विनंती केल्यावर भगवंतानी आपले रौद्र रूप थोडे सौम्य केले.

दैत्यराज हिरण्यकश्यपूला मारण्यासाठी भगवतांनी नरसिंह अवतार घेतला. हिरण्य कष्यपूचा वध केल्यावर भगवंताने प्रल्हादाला काय वरदान देऊ असा प्रश्न विचारला, तेंव्हा भक्त प्रल्हाद यांनी स्वतःसाठी काहीही मागितले नाही तर आपल्या प्रजेवर कृपा करावी अशी प्रार्थना केली. त्यामुळे भगवंत अधिक प्रसन्न झाले.

ज्ञानेश्वरीत माऊली वर्णन करतात,

*"पाहें पां भक्तीचेनि आथिलेपणें । दैत्यीं देवां आणिलें उणें ।
माझें नृसिंहत्व लेणें । जयाचिये महिमें ॥ तो प्रल्हादु गा मजसाठीं । घेतां बहुतें संकटे सदा किरीटी ।
कां जें मियां द्यावें ते गोष्टी । तयाचिया जोडे ॥"* (संदर्भ ज्ञा. ९/४५०, ४५१)

(भगवंत म्हणतात की माझे नाव घेण्यापेक्षा भक्त प्रल्हादाचे चरित्र श्रवण केले तरी तो मनुष्य परमार्थाचा अधिकारी होऊ शकेल.)

अभिमान हाच सामान्य माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. हाच मनुष्याच्या मनातील हिरण्याकष्यपू!!! या हिरण्यकष्यपूला समूळ नष्ट करण्यासाठी नामस्मरण हाच एकमेव रामबाण उपाय आहे, असे सर्व संत सांगतात. अखंड नामस्मरण करणाऱ्या भक्ताच्या पाठीशी भगवंत उभा असतो, असे सर्व संत सांगतात. म्हणून आपण अखंड नामस्मरण करण्यास प्रारंभ करू.

**"जे अंकित ईश्वराचे| तयांस सोहळे निजसुखाचे | धन्य तेचि दैवाचे| भाविक जन ||"** (दा. ०३.१०.१२)

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# हिंसा, भीती विरोधात भारत जोडो यात्रा : राहुल गांधी

## महाराष्ट्राप्रमाणे मध्य प्रदेशातही भारत जोडो यात्रेला मोठे जनसमर्थन मिळेल : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**बोरडेली :** भारत जोडो यात्रेचे महाराष्ट्राने खूप चांगले नियोजन आणि आयोजन केले त्यासाठी त्यांना A+ गुण दिले आहेत. महाराष्ट्राच्या जनतेने मोठा पाठिंबा दिला. १४ दिवसात महाराष्ट्राकडून खूप काही शिकायला मिळाले. महाराष्ट्रातून सर्व देशात संदेश गेला आहे. आता मध्य प्रदेशात ३७० किलोमीटरची पदयात्रा करून पुढचा प्रवास करत श्रीनगरमध्ये तिरंगा फडकवणार, याला कोणीही रोखू शकत नाही. भारतात द्वेष, हिंसा आणि भिती पसरवली जात आहे याविरोधात ही भारत जोडो यात्रा आहे, असे खा. राहुलजी गांधी यांनी म्हटले आहे. भारत जोडो यात्रेने आज महाराष्ट्रातून मध्य प्रदेशात प्रवेश केला. यावेळी बोरडेली जि. बू-हाणपूर येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मध्य प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कमलनाथ यांच्याकडे तिरंगा सोपवला. हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. जनतेला संबोधित करताना राहुलजी गांधी म्हणाले की, भाजपा सरकार लोकांमध्ये भिती निर्माण करत आहे. शेतमालाला योग्य भाव न देऊन तसेच पीक विम्याची नुकसान भरपाई न देऊन शेतक-यांना घाबरवले जात आहे. कामगारांना मनरेगाचे काम न देऊन भिती निर्माण केली जात आहे. शेतकरी, कामगार, महिलांच्या मनातून ही भिती काढली पाहिजे. कोणालाही घाबरू नका हे सांगण्यासाठीच ही पदयात्रा आहे. शिक्षण व बेरोजगारीवर बोलताना राहुलजी म्हणाले की, या पाच वर्षाच्या रुद्रला डॉक्टर व्हायचे आहे, याने तसे स्वप्न पाहिले आहे, त्यासाठी तो शिक्षण घेईल, डॉक्टर बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेईल पण आजच्या हिंदुस्थानात रुद्रचे स्वप्न साकार होणार नाही कारण रुद्रसारख्या असंख्य मुलांना मी भेटलो त्यांच्या व्यथा ऐकल्या आहेत. शिक्षण संस्था खाजगी झाल्या आहेत. शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात पण एवढे करुनही तो डॉक्टर बनू शकत नाही दुसरेच काही तरी काम त्याला करावे लागेल. चार-पाच मोजक्या उद्योगपतींच्या हातात सर्व यंत्रणा दिली आहे, हा अन्याय करणारा हिंदुस्थान आहे आणि तो आपणास नको आहे. युपीएचे सरकार होते तेव्हा ४०० रुपये गॅस सिलिंडर होता आज १२०० रुपये



झाला आहे, पेट्रोल ६० रुपये लिटर होते आज १०७ रुपये झाले आहे, हा सर्व पैसा कोणाच्या खिशात जात आहे? हा सवाल करत आम्ही 'मन की बात' करत नाही, लोकांची 'मन की बात' ऐकतो, असा टोलाही मारला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले की, भारत जोडो यात्रेने ६ राज्य पूर्ण करून आता मध्य प्रदेशात प्रवेश केला. या यात्रेचे जल्लोषात स्वागत केले. मध्य प्रदेशातही भारत यात्रींना भरभरून प्रेम व पाठिंबा मिळेल. मध्य प्रदेशातही पदयात्रा आणखी यशस्वी होईल. महाराष्ट्राच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करून मध्य प्रदेशही चांगले आदरातिथ्य करेल. महाराष्ट्रात यात्रेला लोकांचा भरपूर पाठिंबा मिळाला. विविध वर्गातील लोक यात्रेत सहभागी झाले होते. उत्कृष्ट आयोजनाबद्दल राहुलजी गांधी यांनी महाराष्ट्राचे कौतुक केले. विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, कन्याकुमारी पासून सुरु झाल्यापासून प्रत्येक राज्यात प्रतिसाद वाढतोय. मध्य प्रदेशात भारत जोडो यात्रेचे जोरदार स्वागत झाले. भारतात विविधतेतून एकता निर्माण करत आहेत. महात्मा गांधी यांनी जे काम स्वातंत्र्यापूर्वी केलं ते आज राहुल गांधी करत आहेत. भारत जोडो यात्रा जेव्हा श्रीनगरला पोहोचेल तेव्हा संपूर्ण देश एक झालेला असेल याचा मला विश्वास आहे.

## पत्रकाराला मारहाण करणारा आरोपीस अटक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** चिकलठाणा पोलिसांनी न्यूज चॅनलच्या पत्रकाराला मारहाण करणाऱ्या गुंडाला अटक केली आहे. अशी माहिती एपीआय सुदाम शिरसाठ यांनी दिली. अमजद पठाण रा. हिनानगर असे अटक आरोपीचे नाव आहे.



२०नोव्हेंबर रोजी पत्रकार बाबुलाल राठोड यांना चिकलठाणा परिसरातील अमजद पठाण व त्याच्या साथीदार गुंडांनी गोवंश वाहतूक करण्याचे वार्तांकन केल्या प्रकरणी पोलिसांसमोर मारहाण केली होती. या प्रकरणी चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले होते. पोलिस उपविभागिय अधिकारी जयदत्त भंवर या प्रकरणी तपास करंत होते. त्यांना आरोपींबद्दल माहिती मिळताच एपीआय सुदाम शिरसाठ यांना आरोपी पठाण ला अटक करण्याचे आदेश दिले होते. पुढील तपास एसडीपीओ भंवर करत आहेत.

## अन्नदान



गुरू तेज बहादूर जयंतीनिमित्त अनाथ आश्रमाला डी. डी. फाउंडेशनतर्फे भोजन वाटप करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे दिलीप डाखोळे व पदाधिकारी.

## प्रा. बाळासाहेब बोराडे माहिती अधिकार संघाच्या सचिवपदी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** माहिती अधिकार महासंघाच्या मुंबई येथे झालेल्या बैठकीत राजूर येथील सामाजिक कार्यकर्ते प्रा.बाळासाहेब बोराडे यांची माहिती अधिकार महासंघाच्या भोकरदन तालुका संघटन सचिव पदी निवड झाली आहे. माहिती अधिकार फेडरेशनचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष वसेकर यांच्या हस्ते निवड झाल्याचे पत्र नुकतेच प्रा.बोराडे यांना प्राप्त झाले आहे. सार्वजनिक कामकाजात अधिकाधिक पारदर्शकता निर्माण होऊन सामान्य नागरिकांना माहिती मिळावी या उद्देशाने माहिती अधिकार अधिनियम२००५ हा कायदा अस्तित्वात आला आहे. हा जनसामान्यांचा कायदा असून या कायद्याचा वापर करून प्रशासन पारदर्शी, लोकाभिमुख व भ्रष्टाचार मुक्त करून प्रशासनावर वचक निर्माण करणे हा या कायद्या मागचा मुख्य उद्देश आहे. माहिती अधिकार कायद्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी माहिती अधिकार महासंघाच्या माध्यमातून माहिती अधिकार कार्यकर्ते सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतात.त्याचाच एक भाग म्हणून प्रा.बोराडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवड झाल्यानंतर माहिती अधिकार कायद्यासंदर्भात समाजात जनजागृती करून जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे मत प्रा.बोराडे यांनी व्यक्त केले.त्यांच्या या निवडीबद्दल जालना जिल्हा माहिती अधिकार संघाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.



## सी. एस. एम. एस. एस. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या स्टार्ट-अप कल्पनांना मसिआकडून अर्थसहाय्य




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ऍग्रीकल्चर व टाटा टेक्नॉलॉजीज सीएसआर यांच्यात सयुंक्त उपक्रमाने यांनी नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी लॉन्च इनोव्हेशन आयडिया ऍक्सिलरेशन नुकताच कार्यक्रम आयोजित केला होता, त्यात विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यात छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या स्टार्ट-अप कल्पनांना मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्री अँड ऍग्रीकल्चर (मसिआ) कडून ५०,००० रुपये इतके अर्थसाहाय्य मिळाले आहे.

यामध्ये विद्यार्थ्यांची शेती उपयुक्त अशी स्टार्टअप कल्पना आहे, त्यात स्वयंचलित भाजीपाला लागवड यंत्र याचा समावेश असून या यंत्रणेने टमाटे, मिर्ची, वांगी यासारख्या रोपांची लागवड करता येते. जी शेतकऱ्यांसाठी अतिशय फायदेशीर आणि उपयुक्त आहे. ही यंत्रणा कमीतकमी मनुष्यबळ आणि कमीतकमी वेळेत जास्तीचे भाजीपाला रोपांची लागवड करतात. या यंत्रणेने शेतीमधील दोन रोपांमधील अंतर निर्धारित करता येते. तसेच कमी जागेत जास्त उत्पादन घेता येते. ट्रेमधील रोपांची लागवड ही स्वयंचलीतरित्या जमिनीमध्ये होते.
स्टार्टअप कल्पनेवरती काम करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वैभव जाधव (कर्णधार), रवींद्र घाटे, शेख दानियाल, गुफरान अन्सारी, राणी राठोड, निकिता राठोड, रिया धूत, धोरती कोलते, अल्ताफ शेख, रोहन मुरदारे, त्यांना डॉ. रामचंद्र चोपडे (हेड ऑफ डिपार्टमेंट, मेकॅनिकल), प्रा. दीपक पवार (टि .पी.ओ ), डॉ. देवेंद्र भुयार (हेड ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्पुटर विभाग ) एस. बी. कुलकर्णी (ट्रैनिंग हेड), सत्या प्रवीण (हेड ऑफ सि. टी. एस. ई ), प्रा. सचिन लहाने यांचे मार्गदर्शन लाभले.
या कार्यक्रमात मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्री अँड ऍग्रीकल्चर (मासिआ ) ऍग्रीकल्चर टीम अध्यक्ष श्री. किरण जगताप, उपाध्यक्ष श्री. अनिल पाटील, श्री भगवान राऊत, टाटा टेक्नॉलॉजीकलचे श्री सिद्धार्थ यावलकर, आयईपीसीचे इरादत खान आणि इतर मान्यवर उपस्थित होते. सह तंत्रज्ञान क्षेत्रातील जेष्ठ मान्यवरांच्या पॅनलनें कल्पनांची अंतिम निवड केली आहे. विद्यार्थी सी. एस. एम. एस. एसच्या इनोवेशन अँड रिसर्च सेंटर येथे त्यांच्या स्टार्टअप कल्पनांवर आधारित प्रकल्पाची निर्मिती करतील. यशस्वी विद्यार्थ्यांचे छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पदमाकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख आणि प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांनी अभिनंदन केले.

## किरण चौधरी महाराष्ट्र संघात; प्रशिक्षकपदी डॉ.सत्यजित पगारे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** किरण चौधरी यांची निवड आंध्र प्रदेश येथे होणाऱ्या महिलांच्या राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात करण्यात आलेली आहे. तर महाराष्ट्राच्या संघाच्या प्रशिक्षकपदी औरंगाबादचेच डॉ.सत्यजित पगारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आंध्र प्रदेशातील नाद्याल येथे 25 ते 30 नोव्हेंबर दरम्यान या स्पर्धा भारतीय हँडबॉल महासंघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले आहेत. नुकतेच सातारा येथील वाई मध्ये महाराष्ट्र हँडबॉल संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला सीनियर महिलांच्या हँडबॉल स्पर्धेमध्ये औरंगाबादच्या किरण चौधरीची चांगली कामगिरी पाहता तिची महाराष्ट्राच्या संघात समावेश करण्यात आलेला आहे. तर दीर्घ काळापासून हँडबॉलचे अनेक खेळाडू निर्माण करणारे औरंगाबादचेच डॉ.सत्यजित पगारे यांची महाराष्ट्र संघाच्या प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. किरण चौधरी आणि डॉ.सत्यजित पगारे यांना पुढील वाटचालीसाठी औरंगाबाद जिल्हा हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष माजी आ. श्रीकांत जोशी, सचिव प्रा.प्रभाकर भारसाखळे यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## केंद्र सरकारचे उत्तर

आधुनिक केसरी

केंद्रीय निवडणूक आयोगातील निवडी या आताही पारदर्शक पद्धतीनेच केल्या जात असल्याचे उत्तर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिले आहे. केंद्रिय निवडणूक आयोगातील मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर दोन निवडणूक आयुक्तांची निवड ही पारदर्शक पद्धतीने केली जावी अशी टिप्पणी करताना सर्वोच्च न्यायालयाने या निवडींवर काही प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर आता केंद्र सरकारने उत्तर दिले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर दोन आयुक्तांच्या निवडीमध्ये पारदर्शता आणण्यासंबंधी एक याचिका दाखल करण्यात आली आहे, त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. केवळ काल्पनिक स्थितीच्या आधारे कॅबिनेटच्या निर्णयावर अविश्वास दाखवू नये, निवडणूक आयोगात सध्या केल्या जाणाऱ्या नियुक्त्या या योग्य आणि पारदर्शक पद्धतीनेच केल्या जात आहेत असे उत्तर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिले आहे. या आधी या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, केंद्रिय निवडणूक आयोगातील निवडी या पारदर्शक पद्धतीने केल्या गेल्या पाहिजेत. त्यासाठी सरन्यायाधीश, पंतप्रधान आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेत्यांची समिती तयार करण्यात यावी आणि त्यांच्याकडे या निवडीचा निर्णय सोपवला जावा. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने यावर सुनावणी करताना म्हटलं की, राज्यघटनेमध्ये मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर दोन निवडणूक आयुक्तांची निवड कशा पद्धतीने करण्यात यावी यावर मौन बाळगले आहे. पण ही पदे लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावतात. त्यामुळे यांच्या निवडीमध्ये अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता आणण्यात यावी. त्यामुळे या पदांवर सर्वोत्तम व्यक्ती बसेल. तसेच राज्यघटनेचे कलम 324 संदर्भात नवीन कायदा बनवण्यात यावा. पंतप्रधानावर आरोप झाले तरीही निवडणूक आयोगाने त्यांच्यावर कारवाई करण्याचे धाडस दाखवावे, निवडणूक आयुक्त हे सक्षम असावेत असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. केंद्रिय निवडणूक आयोगातील मुख्य आयुक्त आणि इतर दोन आयुक्तांच्या निवडी या न्यायालयाच्या कोलॅजियम पद्धतीप्रमाणे करण्यात याव्यात, त्यामध्ये पारदर्शकता यावी यासाठी 2018 साली सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली आहे. केंद्र सरकार त्यांच्या मर्जीतल्या व्यक्तींची या पदांवर निवड करते असा आरोप या याचिकेतून करण्यात आला आहे. या याचिकेवर पाच न्यायाधीशांच्या घटनापीठांसमोर सुनावणी सुरू आहे.

## माफीचे राजकारण

आधुनिक केसरी



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

**राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेमध्ये त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर निशाणा साधलेला आहे. आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अंदमानच्या जेलमधून इंग्रज सरकारला लिहिलेला एका पत्राचा दाखला दिलेला आहे. त्यामधील ओळी वाचून राहुल गांधी म्हणतात की सावरकर इंग्रजांना म्हणतात की मला तुमचा नोकर म्हणून राहायचे आहे त्यामुळे माझी तुम्ही सुटका करावी. राहुल गांधींचे म्हणणे हे आहे की स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजांची माफी मागितलेली होती. ते इंग्रज सरकारला मदत करीत होते. या वरून बराच राजकीय वाद निर्माण झाला आहे.**

सावरकर प्रेमींनी राहुल गांधीच्या या विधानाचा खरपूस समाचार घेतलेला आहे. परंतु ज्या एका पत्रामुळे राहुल गांधी खूप शेर बनलेले आहेत ते पत्र स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अंदमानच्या जेलमधून इंग्रज सरकारला लिहिलेले पत्र आहे. त्यात त्यांनी मला अंदमानच्या तुरुंगातून मुक्त करावे अशी मागणी केलेली होती. या मुक्ततेच्या मागणीला जर कोणी माफी म्हणत असेल तर त्यांनी काही गोष्टी समजून घेण्याची निश्चितच आवश्यकता आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जीवन हे एका राष्ट्रभक्त व्यक्तीचे जीवन होते. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणजे लाखो युवकांचे प्रेरणास्थान. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणजे स्वातंत्र्याचा धगधगता यज्ञ. त्यांनी इंग्रज सरकारला लिहिलेल्या एका पत्रामुळे हा यज्ञ विझून जाईल का? अजिबात जाणार नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्रजांचे प्रेमी असते तर त्यांनी विदेशी वस्त्रांची होळी का केली असती? स्वातंत्र्यवीर सावरकर हे इंग्रजांचे प्रेमी असते व त्यांचे मदतगार असते तर 1857 चे स्वातंत्र्यसमर या त्यांनी लिहिलेल्या पुस्तकावर इंग्रज सरकारने प्रकाशन पूर्व बंदी का घातली असती? इंग्लंड मध्ये राहणाऱ्या भारतीय तरुणांना स्वातंत्र्याची प्रेरणा देण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंडमध्ये बॅरिस्टरची पदवी मिळविण्याकरता गेले परंतु तेथे पदवी निमित्ताने राहणे हे केवळ एक कारण होते. तिथे गेल्याबरोबर ते लाला हरदयाळ, मॅडम कामा आणि इतर विविध क्रांतीकारकांसोबत काम करू लागले. 1857 च्या स्वातंत्र्य समरास 50 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तशा आशयाचा बिल्ला छातीवर लावण्यास त्यांनी भारतीय विद्यार्थ्यांना सांगितले व स्वतःही लावला. या अपराधास्तव कॉलेज प्रशासनाने त्यांना माफी मागायला सांगितली. सावरकरांनी त्यास नकार दिल्यामुळे त्यांना बॅरिस्टर ची ब्रिटिशांनी दिली नाही. या वरून सावरकरांचे राष्ट्रप्रेम आपल्या लक्षात येईल.इंग्रज सरकारचा ससे मीरा सतत त्यांच्या मागे लागलेला होता. मदनलाल धिंगरा यांनी जी कर्झन वायली ची हत्या केली त्यामागे प्रेरणा ही स्वातंत्र्यवीर सावरकरांचीच होती.



स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या या कारवायांमुळे इंग्रज सरकार त्यांच्या पाठीमागे लागलेले होते व त्यांना सळो की पळो करून सोडलेले होते. इंग्लंडमध्ये जेथेही ते राहावयास जात तेथे पोलीस पोहचायचे व त्यांना ते घर सोडायला भाग पाडायचे. असे एका दिवसात तीन वेळा घर बदलण्याचा प्रसंगही सावरकरांवर आलेला आहे.यावरून ते ब्रिटिशांच्या विरोधात होते हे स्पष्ट होते. मॅडम कामा व इतर क्रांतिकारकांसोबत बैठक सुरू असताना त्यांचा मुलगा प्रभाकर यांच्या मृत्यूची तार त्यांना पोहोचली तरी ते अविचल पणे त्या बैठकीत बसून राहिले. सावरकरांचे सर्व बंधू हे क्रांतिकारकच होते. त्यांचे बंधू बाबाराव सावरकर यांना सुद्धा अंदमानच्या तुरुंगामध्ये काळे पाण्याची शिक्षा होऊन खितपत पडावे लागले होते. इंग्रज सरकारने त्यांचे राहते घर सुद्धा जप्त केले होते व त्यांच्या पत्नी व वहिनीला भर पावसात घर सोडावे लागले होते. अनेक क्रांतिकारक जे अंदमान मधील यातनांना कंटाळून आत्महत्या करण्याचा विचार किंवा प्रयत्न करीत असत अशा क्रांतिकारकांना धीर देण्याचे व समजावण्याचे काम सावरकर करीत होते. तेथे राहणाऱ्या अनेकानेक क्रांतिकारकांची आता आमचे सर्वच जीवन या कारागृहात जाईल की काय व आमचा अंतही इथेच होईल की काय अशा पद्धतीची भावना होती. सावरकर त्यांना म्हणायचे की आज जरी आम्ही इथे खितपत पडलेले असलो व आमच्या यातना व वेदना भारतात राहणाऱ्या आमच्या बंधूंना दिसत नसल्या तरीही सुद्धा देश स्वतंत्र झाल्यानंतर आम्ही जर येथून स्वतंत्र भारतात परतु शकलो नाही तर उद्या हेच आमचे देश बांधव आमच्यासाठी या तुरुंगाचे दर्शन करायला येतील व या तुरुंगात आमचे पुतळे उभे करतील असे सावरकर त्यांना म्हणायचे.स्वातंत्र्यवीर सावरकर 10 वर्ष अंदमानच्या तुरुंगात होते.इंग्रजांनी त्यांना तेथे त्यांच्यावरील प्रेमापोटी ठेवले होते का?अर्थातच नाही. सावरकरांनी ज्या देशभक्ती वर अनेक कविता लिहिल्या आहे त्यातून त्यांची देशभक्ती प्रकट होत नाही का? सावरकर इंग्रजांच्या तुरुंगामध्ये होते. एका कैद्यासमोर स्वतःच्या सुटकेसाठी प्रयास करणे हे त्याचे आद्य कर्तव्य होवून जाते. त्यामुळे पत्रातील भाषा ही त्यांची सुटकेसाठीची रणनीती असू शकते किंवा पत्राचा तो मायना असू शकतो म्हणजे पत्र लिहिण्याची ती पद्धती असू शकते. मदनलाल धिंगरांनी कर्जन वायलीला मारल्यावर ते कुठेही पळून गेले नाही. त्यांनी आपले पिस्तूल इंग्रज अधिकाऱ्याच्या हवाली केले व स्वतःला अटक करून घेतली. आपण पकडले गेल्यानंतर आपल्याला फाशी होईल हे त्यांना माहीत असताना सुद्धा त्यांनी स्वतःला अटक करून घेतली. भगतसिंग यांनी सुद्धा पार्लमेंट मध्ये बॉम्बस्फोट घडविल्यानंतर स्वतःला अटक करून घेतली होती.त्याकाळी क्रांतीच्या वेगवेगळ्या कल्पना होत्या. वेगवेगळ्या पद्धतीचे क्रांतिकारक होते. एकाने स्वतःला स्वतःहून अटक करून घेतली म्हणून इतरांनी सुद्धा अटक करून घेतली पाहिजे असे म्हणणे चुकीचे आहे. अटक करून घेणे ही सुद्धा देशभक्ती व पळून जाणे ही सुद्धा देशभक्तीच होती हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ज्यांनी चरखा चालवला त्यांच्या देशभक्तीची तुलना ज्यांनी बॉम्बस्फोट घडवून आणले त्यांच्या देशभक्तीची करणे हे चूक आहे. दोघेही आपापल्या ठिकाणी श्रेष्ठ आहेत. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. मग राहुल गांधींना सावरकरांनी माफी मागितली असे देशास सांगून काय सिद्ध करायचे आहे?जनतेची ही दिशाभूल कशासाठी?सावरकरांना बदनाम करण्यामागे हिंदुत्वाला बदनाम करण्याचा त्यांचा हेतू आहे का?सावरकर हिंदुत्ववादी नसते तरीही देशातील जनता ही हिंदुत्वाला मानणारीच असती. हिंदुत्व ही या देशाची विचारधारा आहे. सर्व सामान्य जनता या विचारधारेला मानते व सावरकर ही मानायचे. परंतु राहुल गांधी या विचारधारेला मानत नाही. मग हिंदुत्ववादी जनता राहुल गांधींच्या मागे कशी उभी राहील?हिंदुत्ववादी लोक ज्यांना स्वातंत्र्यवीर संबोधतात त्यांचा राहुल गांधी अपमान करीत असतील तर जनता नाराज होणारच. राहुल गांधी हिंदुत्ववादी जनते ला कोणाला खूष करण्यासाठी नाराज करीत आहेत?सावरकरांच्या माफीचे हे राजकारण हिंदू विरोधी आहे. त्यामुळे ही यात्रा भारत जोडो नाही तर भारत तोडो अशीच आहे. स्वातंत्र्य काळापासून काँग्रेस हिंदू विरोधी राजकारण करीत आलेली आहे. हिंदूंचे देवी देवता, संत, महापुरुष श्रद्धास्थान यांना कमी लेखण्याचे, यांचा अपमान करण्याचे कार्य काँग्रेसने नेहमीच केलेले आहे. हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व आहे हे काँग्रेसने कधीच मान्य केले नाही. त्यामुळे या देशातील बहुसंख्य समाजाच्या मनामध्ये स्वतःच्या ओळखीबद्दल हिंदुत्वाबद्दल न्यूनगंड निर्माण करण्याचे कार्य काँग्रेसने केलेले आहे. जनतेने हे ओळखले पाहिजे. स्वातंत्र्यवीरांचा सन्मान कायम राखीत राहुल गांधींना त्यांची जागा दाखविली पाहिजे.

## शादी का लड्डू

आधुनिक केसरी



सीमा देशमुख
अमरावती

**लग्न म्हणजे मुळातच आयुष्यातील खूप मोठा युटर्न म्हणावा लागेल. आजकाल लग्न जुळवणे म्हणजे फार सोपं राहिलं नाही. त्यात नवऱ्या मुलीच्या किंवा मुलाच्या फारच आवडी निवडी असतात . ते म्हणजे मुलगा उंच हवा, दिसायला देखणा हवा, गलेलठ्ठ पगार हवा, गाडी हवी . अशा अनेक मागण्या मुलींकडून केल्या जातात. अर्थात मुलींचेही बरोबर आहे कारण त्याही मुलांच्या बरोबरीने नोकरी करतात पैसा कमावतात आणि घर चालवतात. मग नक्की चुकत कुठे? त्यात घरातल्या मंडळींच्या वेगळ्या मागण्या असतात सून अशी हवी तशी हवी. तिने नोकरी करावी की करू नये. अशा किती? काय काय अनेक समस्या लग्न जुळवताना असतात.**

म्हणूनच लग्न जुळवाजुळवी हे सर्वात किचकट काम होत आहे. आणि जरी ते जुळून आलं तरी ते टीकेलच का? याची खात्री कोणी देऊ शकत नाही. आता हेच बघाना, पूर्वीच्या काळी लग्न जुळवणे म्हणजे एक मोठा सोहळाच असायचा . प्रथम घरातील कोणी तरी ज्येष्ठ मंडळी बाबा ,काका ,मामा, एखादं छानसं स्थळ सुचवायचे. आणि मग मुलीला बघण्याचा कार्यक्रम असायचा. मुलीला बघण्याचा कार्यक्रम म्हणजे त्यात कांदे पोहे हे आलेच. या कार्यक्रमात काही ज्येष्ठ मंडळी, नवरामुलगा त्याची आई ,बहिण, असे उपस्थित असायचे .आणि मग या सर्वांसमोर नवरी मुलगी लाजत मुरडत हातामध्ये पोह्यांचा ट्रे घेऊन सर्वांसमोर यायची मग मुलांकडच्या मंडळींकडून तिला खूप प्रश्न विचारले जायचे.मुली पाय दाखव ?चालून दाखव?काय येत काय नाही? जणूकाही तिचा एक प्रकारचा इंटरव्यू असायचा आणि त्या इंटरव्यू जर ती पास झाली तरच मग पुढची बोलणे व्हायचे .म्हणजे यात नवऱ्या मुलीचा आणि मुलाचा फार मोठा सहभाग नसायचा. घरातील ज्येष्ठ मंडळी ही सर्व प्रक्रिया घडवून आणत असत.

आणि या सर्व प्रक्रियेत मुलीला मुलगा आवडतोय का? किंवा मुलाला मुलगी आवडते का हा प्रश्न फार दुय्यम समजला जायचा. आणि मग लग्न ठरलं की मुलगी निमूटपणे बोहल्यावर चढायची आणि आपला संसार करायची पूर्वीच्या काळी हे सर्व चालत होतं आणि हे संसार देखील टिकत होते कारण त्या काळात स्त्रियांना जास्त स्वातंत्र्य नव्हते त्या पूर्णपणे पुरुषांवर अवलंबून होत्या. थोडी तडजोड थोडा मोठ्यांचा धाक अळीमिळी गुपचिळी या मध्ये त्यांचे संसार टिकून राहत होते.



पण आता मात्र तसे होऊ शकत नाही मुली स्वतःहूनच आपला जोडीदार शोधत असतात विविध विवाह संस्थांच्या माध्यमातून मुलं आणि मुली एकमेकांशी बोलून आपलं लग्न जुळवत असतात यातील शंभर टक्के लग्न यशस्वी होतात असे नाही. काही तरुण युवक युवती प्रेम विवाह करतात. प्रेमविवाह करूनही सर्वच जोडीदार सुखाने संसार करतात असेही नाही.आणि आज काल सर्वात भयंकर उच्च संस्कृतीत जे फॅड आलंय म्हणजे लिव्ह-इन-रिलेशनशिप मधे रहाणे आणि नंतर लग्न करणे. हे म्हणजे लग्न न करताच मुलगा मुलगी एकत्र राहणे एकमेकांना समजून घेणे आणि जर त्यांची मतं जुळली स्वभाव जुळले तर त्यांनी लग्न करणे .हे कितपत योग्य आहे मलाही समजत नाही. कारण नुकताच सोशल मीडियावर व्हायरल झालेलं श्रद्धा आणि आफताब यांचं लिव्ह इन रिलेशनशिप प्रकरण, यात खूप भयंकर गोष्टी उघडकीस आल्या आहेत माणुसकीला काळिंबा फासणारी ही घटना आहे. माणूस इतका विकृत वागू शकतो! ते ही, बातमी वाचल्यावर कळतं. एखाद्या चालत्या बोलत्या व्यक्तीचे 35 तुकडे करणे आणि ते फेकून देणे ही, लिव्ह इन रिलेशनशिप ची राक्षसी वृत्ती समाजात पसरत चालली आहे. माणूस भावना शून्य होत चालला आहे. असं या घटनेतून वाटतं. जसे लोक आधुनिक किंवा पाश्चात्त्य संस्कृतीचा स्वीकार करू लागले आहेत तास तशी , लग्न प्रक्रिया ही अधिकच किचकट व्हायला लागली आहे असं वाटतं. यासाठी आपण फक्त तरुण पिढीला दोष देऊ शकत नाही.मुळातच मुलांवर जर आई-वडिलांचे घराचे संस्कार चांगले असतील तर आपली मुलं योग्य निर्णय योग्य वयात घेऊ शकतात. आणि योग्य जोडीदाराची निवड करू शकतात.

थोडक्यात काय लग्न म्हणजे एक जुगार ज्याला तो जमलं तो जिंकला.म्हणूनच असे म्हणतात की काय शादी का लड्डू जो खाये पछताये जो ना खाये वो भी पछताये तसं पाहायला गेलं तर लग्न ही संस्था आज काहीशी थोडी धोक्यातच आहे. म्हणूनच आपल्या मुलांवर योग्य संस्कार करा. लग्न, अरेंज मॅरेज असो अथवा लव मॅरेज फक्त ते टिकवायचे कसे हे त्यांना समजले पाहिजे. आणि आपली जी पारंपारिक लग्न संस्कृती टिकवून ठेवण्याचा आपण प्रयत्न आपण केला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# महाराष्ट्राचे अनमोल रत्न : संत ज्ञानेश्वर माऊली

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील, परमार्थाच्या क्षेत्रातील 'न भूतो न भविष्यति' असे अजोड व्यक्तिमत्त्व व अलौकिक चरित्र म्हणजे 'संत ज्ञानेश्वर'! गेली सुमारे 725 वर्षे महाराष्ट्रातील सर्व पिढ्यांतील, सर्व स्तरांतील समाजाने जे व्यक्तिमत्त्व आपल्या मनोमंदिरात एक अढळ श्रद्धास्थान म्हणून जपले आहे; आणि जे श्रद्धास्थान पुढील असंख्य पिढ्यांतही कायमच अढळ व उच्चस्थानी राहणार आहे; असे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री संत ज्ञानेश्वर ! संत ज्ञानेश्वर महाराज समाधीदिन कार्तिक वैद्य त्रयोदशी या तिथीला असतो. यावर्षी हा समाधी सोहळा दिन 12 डिसेंबर अथवा 13 डिसेंबरला साजरा केला जाईल. सनातन संस्थेद्वारा संकलित लेखात संत ज्ञानेश्वर महाराजांची थोरवी समजून घेऊया.**

ब्रह्म साम्राज्य चक्रवर्ती, मती गुंग करून टाकणारी अलौकिक काव्य प्रतिभा लाभलेला रससिद्ध महाकवी, महान तत्त्वज्ञ, श्रेष्ठ संत, सकल विश्वाचे कल्याण चिंतणारा भूतदयावादी परमेश्वरभक्त, पूर्ण ज्ञानाचे मूर्तिमंत प्रतीक, श्रीविठ्ठलाचा प्राणसखा - अशा शब्दांत त्यांचे वर्णन केले जाते. परंतु त्यांचे परिपूर्ण वर्णन करण्यासाठी शब्द अपुरे पडल्याचेही जाणवते. संत चोखामेळा पुढील शब्दांत त्यांना वंदन करतात.


**'कर जोडोनिया दोन्ही ।चोखा जातो लोटांगणी। ।महाविष्णूचा अवतार।प्राणसखा ज्ञानेश्वर।।'**

'प्राणसखा' हा अतिशय वेगळा, सुंदर व समर्पक शब्द चोखोबांनी (तेराव्या शतकात) संत ज्ञानेश्वरांविषयी वापरला आहे. 'शूचीनाम श्रीमतां गेहे, योगभ्रष्टोऽभिजायते' (भगवद्गीता 6.41) अशा पवित्र कुळात त्यांचा जन्म आपेगाव येथे तेराव्या शतकात, मध्यरात्री श्रावण कृष्ण अष्टमी, शके 1197(इ.स.1275) रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत कुलकर्णी व त्यांच्या आई रुक्मिणीबाई या होत. गोविंदपंत व मीराबाई हे त्यांचे आजोबा-आजी होत. निवृत्तीनाथ हे ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू. निवृत्ती, सोपान व मुक्ताबाई या त्यांच्या भावंडांचा जन्म अनुक्रमे शके1195, 1199 व 1201 मध्ये झाला. (काही अभ्यासकांच्या मते निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई या सर्व भावंडांचा जन्म आळंदी येथेच अनुक्रमे शके 1190, 1193, 1196 व 1199 मध्ये झाला.) आपेगाव हे औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणजवळ गोदावरी नदीच्या काठावर वसलेले छोटे गाव आहे. श्री विठ्ठलपंत हे मुळात विरक्त संन्यासी होते. त्यांनी संन्यास घेतल्यानंतर गुरुच्या आज्ञेनुसार पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश केला. त्यांना चार अपत्ये झाली. श्री निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशी त्यांची नावे होत. विठ्ठलपंत तीर्थयात्रा करत करत श्री क्षेत्र आळंदी मुक्कामी येऊन स्थायिक झाले. अलंकापुरी (आळंदी) हे सिद्धपीठ होते. त्या काळी संन्यासाची मुले म्हणून सर्व समाज या चौघा भावंडांची हेटाळणी करीत असे. परित्यक्त ब्राह्मण म्हणून त्यांना काळ कंठावा लागला. श्री ज्ञानेश्वरांच्या आई-वडिलांनी देहांत प्रायश्चित घेतले.

श्री निवृत्तीनाथ हेच संत ज्ञानेश्वरांचे सद्गुरू होते. नेवासा क्षेत्रात आपल्या सद्गुरूंच्या कृपाशीर्वादाने भगवद्गीतेवर त्यांनी प्रख्यात टीका लिहिली. या ग्रंथास 'ज्ञानेश्वरी' किंवा 'भावार्थदीपिका' असे म्हणतात. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील 'ज्ञान', श्री संत ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेत आणले.

**माझा मराठाचि बोलू कौतुके।परि अमृतातेहि पैजासी जिंके।**
**ऐसी अक्षरे रसिके।मेळवीन।।**
(ज्ञानेश्वरी - 6.41)

असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती व्यक्त केली आहे. सर्व स्तरांतील लोकांना ही 'ज्ञानेश्वरी' भुरळ घालते. मराठी भाषेतील हा अद्वितीय ग्रंथ आहे. विचार, भावना, आशयाची खोली, अलंकाराचे श्रेष्ठत्व, अद्वैतानुभूती, भक्तीचा ओलावा, रससंपन्नता या सर्वच बाबतीत ज्ञानेश्वरीने उंची गाठलेली आहे. 'पसायदान' ही विश्वकल्याणाची प्रार्थना म्हणजे संत ज्ञानेश्वरांच्या वैश्विक सद्भावनेचा, तसेच प्रतिभेचा परमोच्च




साक्षात्कार आहे. कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग सांगणाऱ्या ग्रंथराज ज्ञानेश्वरीत सुमारे 9000 ओव्या आहेत. हा ग्रंथ इ.स. 1290 मध्ये लिहिला गेल्याचे मानले जाते. तर संत नामदेव महाराज म्हणतात,

'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ।एक तरी ओवी अनुभवावी।।'

त्यांचा दुसरा ग्रंथ 'अनुभवामृत' किंवा 'अमृतानुभव' होय. हा विशुद्ध तत्त्वज्ञानाचा, जीव-ब्रह्म ऐक्याचा ग्रंथ आहे. सुमारे 800 ओव्या (दहा प्रकरणे) या ग्रंथात आहेत. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हा श्रेष्ठ ग्रंथ आहे. 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथाद्वारे त्यांनी चांगदेवांचे गर्वहरण करून त्यांना उपदेश केला. चांगदेव हे महान योगी 1400 वर्षे जगले असे मानले जाते. पण यांचा अहंकार गेला नव्हता. यासाठी संत ज्ञानेश्वरांनी उपदेशपर लिहिलेले 65 ओव्यांचे पत्र म्हणजे चांगदेव पासष्टी हा ग्रंथ होय. यात अद्वैताचे अप्रतिम दर्शन आहे. संत ज्ञानेश्वरांचा 'हरिपाठ' (अभंगात्मक, 28 अभंग) हा नामपाठ आहे. यात हरिनामाचे महत्त्व सांगितले आहे. ही वारकऱ्यांची त्रिकाल संध्याच होय. हे अभंग आशयसंपन्न तर आहेतच परंतु प्रत्यक्ष अनुभूतिसंपन्न आहेत. हरिप्राप्तीचे सोपे सुलभ साधन म्हणजे नामस्मरण होय, असेच हरिपाठ सांगतो. भक्तीला ज्ञानेश्वरांनी पंचम पुरुषार्थ मानले आहे. 'कर्मे ईशु भजावा' हाच त्यांचा कर्मयोग व भक्तियोग आहे. त्यांच्या वाङ्मयाला परतत्त्वाचा स्पर्श झालेला आहे. वाङमयीन सौंदर्य व गुणविशेषांबरोबरच मराठीचा अभिमान, संयम, उदात्तता, नम्रता, त्यांचे निर्मळ चारित्र्य, सर्वसमावेशकता, वात्सल्य, भक्तिपरता आणि कालातीतता असे अनेक गुणविशेष त्यांच्या साहित्यातून आपल्याला अनुभवण्यास मिळतात. ज्ञानदेवांसह सर्व भावंडांवर तत्कालीन समाजाने प्रचंड अन्याय केला, पण त्या अन्यायाविषयीची पुसटशी प्रतिक्रियादेखील त्यांच्या साहित्यात आढळत नाही, हे विशेष !

`ज्ञानदेव म्हणजे माय मराठीचे हृदय ! निसर्ग हाच श्रीकृष्ण, जाणीव हाच अर्जुन, यांच्या संवादातला मर्माभ्यास ही ज्ञानेश्वरी. जाणिवेच्या पातळीवरील सखोल चिंतन ही चांगदेव पासष्टी. मननाचा मनःपूत महोत्सव हाच अमृतानुभव. मानसिक शुद्ध स्नान म्हणजे हरिपाठ. सगुण अनुभवाची कोजागिरी म्हणजे ज्ञानदेवांची भजने होत', अशा समृद्ध शब्दांत ज्येष्ठ अभ्यासक यशवंत पाठक संत ज्ञानेश्वरांचे व त्यांच्या साहित्याचे वर्णन करतात. 'जो जे वांछिल, तो ते लाहो' असे म्हणत अखिल विश्वाची जणू काळजी वाहणाऱ्या संत ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायासह सर्वच भक्त प्रेमाने 'माउली' म्हणतात. त्यांनी धर्मातील क्लिष्ट अवडंबरे काढून धर्माला कर्तव्याचा वेगळा अर्थ दिला. वाङ्मय निर्मितीबरोबरच त्यांनी आध्यात्मिक लोकशाहीचे बीज रोवण्याचा यशस्वी प्रयत्न चंद्रभागेच्या वाळवंटात केला. भागवत धर्माचा तथा वारकरी संप्रदायाचा पाया रचण्याचे अभूतपूर्व कार्य त्यांनी केले. संत नामदेव, संत गोरोबा कुंभार, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा या समकालीन संत प्रभावळीचे अनौपचारीक नेतृत्व करत, संत ज्ञानेश्वरांनी अध्यात्माच्या क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

'अमृतानुभव' या ग्रंथाच्या लेखनानंतर संत ज्ञानेश्वरांनी तीर्थयात्रा केली. संत नामदेव महाराजांच्या 'तीर्थावली' मध्ये या तीर्थयात्रेचा उल्लेख आढळतो. या यात्रेनंतर माउलींनी समाधी घेण्याचा निर्णय घेतला. संत नामदेवांच्या 'समाधीच्या अभंगांमध्ये तत्कालीन संदर्भ सापडतात. अन्य संतांची मानसिक स्थिती, त्यांच्यासह समाजाला झालेले दुःख, स्वतः नामदेव महाराजांच्या वेदना, ज्ञानेश्वरांचा संयम आणि निग्रह या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब समाधीच्या अभंगांत आढळते. संतवर्य ज्ञानदेवांनी वयाच्या अवघ्या 21 व्या वर्षी, आळंदी येथे इंद्रायणी नदीच्या पावन तीरावर संजीवन समाधी घेतली (कार्तिक वद्य त्रयोदशी, शके 1218, दूर्मुखनाम संवत्सर, इ.स.1296, गुरुवार). हा 'ज्ञानसूर्य' मावळल्यानंतर अवघ्या वर्षभरात निवृत्ती, सोपान व मुक्ताबाई या भावंडांनी इहलोकीची यात्रा संपवली.

# राजपूत-परदेशी संघटीत होण्याचे फायदे

आधुनिक केसरी

धोंडीराम राजपूत
संपर्क क्र. ९४२१३१२२४४

राजपूत-परदेशी समाज हा मूळचा भटका समाज, ह्या गावाहून त्या गावी जाणारा, दुसरे असे की या देशाचा मूळ रहिवाशी हा राजपूत समाजच आहे,देशावर जेंव्हा जेंव्हा संकटे आली, परकीय सत्तानी भारतमातेवर आक्रमण केले तेंव्हा-तेंव्हा या समाजातील शूरवीरांनी, लढवैयांनी शत्रूशी सामना केला सर्वां पुढे राजपूत/परदेशी समाजाचेच योद्धे राहत, ते शूर, लढवैय व मागे न हटणारे तसेच देश, मातृभूमीशी एकनिष्ठ राहणार हा समाज काल होता,आज आहे,व उद्याही राहणार आहे. देशसेवेला प्राधान्य देणारा,भारतमतेसाठी प्राणांची आहुती देणारा हा समाज आजही विखुरलेल्या अवस्थेत आहे,त्यांच्या या विखुर अवस्थेचा लाभ शत्रूंनी घेऊन, काही स्वार्थी मंडळींनी घेऊन या समाजाला मागे ठेवले, आजही या समाजाला शिक्षण महत्व माहित नाही, मुलांना लहान पनापासून दुग्ध व्यवसाय, मोल मजुरी,शेती, शेतकामगार, रोजनदारी मजुरी,हमाली, चाकरी, कामगार, हमाल, हातगाडी चालवून पोट भरणार समाज आपल्या मूलभूत हक्कापासून, घटनात्मक अधिकारापासून कोसोदूर आहे. म्हणून शासनाने याजातीचा, त्यांच्या मुलांचा शैक्षणिक विकास व्हावा म्हणून त्यांना "विमुक्त जाती"या मागास प्रवर्गात टाकले आहे, मात्र काही समाज कंटक या समाजाच्या या बाबीला विरोध करून या समाजाविरुद्ध कटकारस्थान रचत आहे. हे कट कारस्थान थांबवे व शासनाही या समाजाच्या उन्नतीसाठी, विकासासाठी आथिर्क विकास मंडळ स्थापन करावे. व या समाजाच्या तळा गाळातील घटकांना कर्ज उपलब्ध करून देऊन त्याचा विकास साधावा या जातीच्या विद्यार्थ्यांना शिकता यावे यासाठी विद्यार्थी वस्ती गृह बांधावी सबका साथ-सबका विकास साधावा हि अपेक्षा आज महाराष्ट्रात यू.पी. बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान येथील राजपूत लाखोंच्या संख्येने आहेत त्यांची ही एका छताखाली येण्याची तीव्र इच्छा आहे. समाजात काही अनिष्ट रुढी, परंपरा आहे. त्यांचे समूळ उच्चाटन व्हावे, विकार, व व्यसनाना आळा बसावा देशाच्या उज्वल भवितव्यासाठी व सक्षम करण्यासाठी या समाजातील युवकांचे सहकार्य मिळावे हे सर्व तेव्हाच शक्य आहे. जेव्हा सर्व राजपूत-परदेशी एका छताखाली येतील यासाठी संघटित होणे अत्यंत गरजेचे आहे.

# हिवाळ्यातील आहार

आधुनिक केसरी

हिवाळ्यात आहाराची विशेष काळजी घ्यावी. या ऋतूमध्ये शरीरात अनेक प्रकारचे आजार जडण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत या ऋतूत संपूर्ण धान्य खावे. तसेच भरपूर फळे आणि हिरव्या भाज्या खाव्यात. फळे आणि भाज्यांमध्ये असलेले जीवनसत्त्वे आणि खनिजे हिवाळ्यात आजारांशी लढण्यासाठी प्रभावी ठरतात.

**पुरेसे पाणी प्या**

हिवाळ्यात थंडीमुळे कमी प्रमाणात तहान लागते, त्यामुळे लोक कमी पाणी पितात. मात्र या ऋतूत आवश्यक प्रमाणात पाणी प्यावे. तसेच तुम्ही या हंगामात हर्बल-टी प्यायला तर त्यामुळे एलडीएल कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइडची पातळी देखील कमी करण्यास मदत होते.

**नियमित व्यायाम करा**

हिवाळ्यात शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा. तुम्हाला जिममध्ये जाऊन व्यायाम करता येत नसेल तर रोज फिरायला जा. चालण्याने शरीरात उष्णता निर्माण होते आणि त्यामुळे रक्ताभिसरण वाढते. हिवाळ्यात रक्तातील साखर आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवावे.

**मसाला दूध प्या**

हिवाळ्यात लोक स्वतःला आतून उबदार ठेवण्यासाठी चहा आणि कॉफी पितात. यामध्ये कॅफिनचे प्रमाण जास्त असते आणि ते शरीरासाठी हानिकारक ठरू शकते. त्याऐवजी मसालेदार दूध प्यावे. मसाला दुधात तुम्ही आले, दालचिनी पावडर आणि हळद घालू शकता. यातील पोषक घटक रक्ताभिसरण वाढवतात. त्यामुळे शरीरात उष्णता टिकून राहते आणि रोगप्रतिकारक शक्तीही मजबूत होते. मसाला दूध बनवण्यासाठी एक कप किंवा एक ग्लास दूधात दालचिनी आणि आल्याचा तुकडा टाकून उकळवा. नंतर अर्धा चमचा हळद आणि वेलची पावडर घाला. हिवाळ्यात हे मसाला दूध पिऊन तुम्ही निरोगी आणि तंदुरुस्त राहाल.

# गोवरचा विळखा वाढतोय....

आधुनिक केसरी

श्याम ठाणेदार
संपर्क क्र. ९९२२५४६२९५

मागील दोन वर्षात आपण कोरोना नामक महामारीला तोंड दिले. कोरोना सारख्या जागतिक महामारीला देशातून हद्पार करण्यासाठी आरोग्य विभागासह सर्व विभागांनी जीवाचे रान केले. केंद्राने जेंव्हा कोरोना प्रतिबंधक लस उपलब्ध करून दिली त्यानंतर कोरोना महामारीचा धोका कमी झाला. आज कोरोना भारतातून जवळपास हद्पार झाला आहे. कोरोनावर विजय मिळवल्याचा आनंद साजरा करत असतानाच लम्पि नामक विषाणूजन्य आजाराने जनावरांना विळखा घातला. लम्पिमुळे शेकडो जनावरे मृत पावली. पोटच्या लेकरांप्रमाणे सांभाळलेले पशुधन लम्पिच्या विळख्यात अडकल्याने शेतकरी व गोपालकात भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्यावर पशुसंवर्धन विभागाने जनावरांना लम्पि विरोधी लसीकरण मोहीम सुरू केली आहे. अजूनही लम्पि आजार संपलेला नसतानाच गोवर नामक साथीच्या आजाराने विळखा घालण्यास सांगितले. मुंबई, गोवंडी, भिवंडी, मालेगाव, नाशिक या शहरात लहान बालकांमध्ये गोवर हा साथीचा आजार वाढत



असल्याचे दिसून आले. गोवरचे राज्यात तीन हजारांच्या आसपास संशयित रुग्ण असल्याचे आरोग्य विभागामार्फत सांगण्यात आले असून या आजाराने राज्यात दहा बालके दगावली असल्याची शक्यताही वर्तवली जात आहे. विशेष म्हणून गोवर हा बालकांना होणारा आजार असला तरी मुंबईत दोन प्रौढांनाही हा आजार झाला असल्याची माहिती समोर आली आहे. ताप, सर्दी, खोकला आणि अंगावर पुरळ येणे हे या आजाराचे लक्षण असल्याचे बालरोग तज्ज्ञ सांगत आहेत. अर्थात गोवर हा धोकेदायक आजार नसल्याचेही तज्ज्ञांनी सांगितले असल्याने पालकांना दिलासा मिळाला आहे. गोवरची साथ येण्यामागे महत्वाचे कारण म्हणजे मागील दोन वर्षात मुलांचे रखडलेले लसीकरण. गोवरच्या संशयित रुग्णांपैकी ५० टक्के बालकांनी गोवर प्रतिबंधक लस घेतलेली नाही. कोरोनामुळे मागील दोन वर्षात अनेक बालकांचे लसीकरण रखडले आहे. कोरोनामुळे अनेक ठिकाणी लसीकरण बंद होते तर काही पालकांनी कोरोनाच्या भीतीने मुलांचे लसीकरण टाळले. बालकांना वेळेत गोवर प्प्रतिबंधक लस न मिळाल्यानेच गोवरची ही साथ आली आहे. अर्थात आरोग्य विभागाने गोवरची साथ आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. गोवरच्या रुग्णांच्या उपचारासाठी अतिरिक्त वॉर्डची स्थापना करण्यात आली असून गोवरच्या रुग्णांना आवश्यक असणारा पुरेसा औषध साठा रुग्णालयांना पोहोच झाला आहे. ज्या बालकांना ताप, खोकला आणि अंगावर पुरळ येत आहेत अशा बालकांच्या पालकांनी बालकांना त्वरित रुग्णालयात दाखल करण्याचे आव्हान राज्य सरकारतर्फे करण्यात आले आहे. गोवरचा विळखा आणखी वाढू नये, ही साथ आटोक्यात यावी यासाठी मुंबई महापालिकेने कंबर कसली आहे. ठिकठिकाणी लसीकरणाचे कॅम्प सुरू केले आहेत. सहा महिन्यांच्या बाळाला देखील गोवर प्रतिबंधक लस देता येईल का याचीही चाचपणी सुरू आहे. सरकारच्या या प्रयत्नांस नागरिकांनीही साथ द्यावी. ज्या बालकांनी अद्याप गोवर प्रतिबंधक लस घेतली नसेल त्यांनी त्वरित या लसीचा डोस घ्यावा. गोवरची लक्षणे दिसताच रुग्णालयात धाव घ्यावी. कोणताही आजार अंगावर काढू नये. सरकारच्या प्रयत्नांना नागरिकांनी साथ दिल्यास गोवरची साथ नक्कीच आटोक्यात येईल आणि बालकांची या आजारातून सुटका होईल.

# संवेदनशील मनाचा उत्स्फूर्त आविष्कार 'जावे गुंफित अक्षरे'



डॉ. जगदीश पाटील
संपर्क क्र. 8149498020


आधुनिक केसरी

**भुसावळ येथील पेशाने शिक्षक असलेल्या नवोदित कवयित्री सौ. संध्या भोळे (बोंडे) यांचा पहिलाच काव्यसंग्रह 'जावे गुंफित अक्षरे' दि. 25 रोजी प्रकाशित होत आहे. या काव्यसंग्रहाला प्रा. बी. एन. चौधरी यांची प्रस्तावना लाभली असून प्रा. डॉ. राम नेमाडे यांचा अभिप्राय, प्रा. देवबा पाटील यांचे पाठबळ तर प्रा. किसन वराडे यांनी पाठराखण केली आहे. शिक्षक म्हणून कार्यरत असताना मनात प्रतिभेचे अंकुर फुटल्यानंतर या संवेदनशील कवयित्रीच्या मनाचा उत्स्फूर्त अविष्कार 'जावे गुंफित अक्षरे' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून झालेला आहे. एकूण शंभर कविता असलेल्या या काव्यसंग्रहात कवितेची निर्मिती, देवाची व गुरूंची भक्ती, निसर्ग कविता, लेवागणबोली, स्त्री मनाचा आविष्कार, सामाजिक जाणीवा, नातीगोती, बालकविता अशा एक ना अनेक विषयांवर कवितांची गुंफण करण्यात आली आहे. समर्पक मुखपृष्ठातून कवितेचा आशय नेमकेपणाने व्यक्त झालेला आहे. त्यांच्या अनेक कविता प्रेरणादायी विचारांचा झरा आहेत.**

जेव्हा आपण कविता व त्यातील सुंदर शब्दरचना वाचतो तेव्हा कवीकडे असलेल्या अलौकिक प्रतिभेचा आपल्याला प्रत्यय येतो. दैनंदिन व्यवहारात आपण जे शब्द वापरतो तेच शब्द वापरून कवितेसाठी कवी नेमके शब्द वापरतो. अशा कविता एक वेगळा अनुभव आणि आनंद देत असतात. कलानिर्मितीच्या वेळी माणसाच्या विचारात अलौकिकता असावी लागते. जे प्रतिभावंत असतात त्यांच्या संवेदनक्षमता सूक्ष्म, तीव्र स्वरुपाच्या असतात. जे पाहिले त्याचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. त्यानंतर अनुभव, कल्पना, भाव, विचार यातून कवितेची निर्मिती होते. इतरांनी घेतलेल्या अनुभवांशी कल्पनाशक्ती व तीव्र संवेदनशक्तीमुळे कवीला लेखनाची शैली प्राप्त होते. त्यामुळेच कविता निर्माण होतात. अशाच प्रकारचा अनुभव जावे गुंफित अक्षरे, लेखणी माझी यासारख्या कवितांमधून येतो.

सौ. संध्या भोळे यांनी लिहिलेली बालकविता महत्त्वाची आहे. त्यांची बालकविता एकसुरी व एकरंगी नाही. त्यात विविधता आहे. गणपती बाप्पा, मनीम्याऊ, पाटी पुस्तक, या मुलांनो, पक्ष्या रे पक्ष्या, चिऊताई, पतंग माझा या त्यांच्या कविता लहान मुलांना मनोरंजनासाठी आहेत. बालमनाशी आपुलकीचा संवाद साधणारी त्यांची कविता आहे. मुलांच्या मनाशी संवाद साधणे हे त्यांच्या बालकवितेचे वैशिष्ट्य आहे. यात घर, माणसे, नातीगोती, पशू-पक्ष्यांचे जग साकार झाले आहे. त्यांनी आपल्या कवितेत विविधता आणली आहे.

जावे गुंफित अक्षरे हा काव्यसंग्रह म्हणजे विविध प्रकारच्या कवितांची गुंफण केलेला गुच्छ आहे. जीवनभाव, जीवन ऐसे नाव, सुख म्हणजे, पराभवाची अकस्मात वादळे असे सामाजिक जाणिवेच्या विविध प्रकारचे दर्शन या काव्यसंग्रहात आहेत. दाह ग्रीष्माचा, शेतकरी मह्या धनी या त्यांच्या कवितांतून शेतकऱ्यांचे दुःख व्यक्त करणारा कळवळा आहे. त्यातून ते शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडतात. त्यांना निसर्गाची आवड आहे. त्यांच्या कवितेतून निसर्गातील सौंदर्याचे सुक्ष्म वर्णन त्यांनी श्रावणगान, हिरवा शालू, सुंदर बन, गुलाब या कवितांमधून केले आहे. पर्यावरणविषयक जागतृता निर्माण करण्याचा संदेशही त्या देतात. विठ्ठलाच्या भक्तीचा महिमासुद्धा त्यांनी आपल्या विठ्ठला तुझी आस, आषाढीची वारी या काही कवितांमधून वर्णिला आहे.




त्याच्या कवितांतून स्त्री जाणिवा व स्त्री संवेदना उमटून स्त्रियांचं भावविश्व दिसते. कवितांचा आशय आणि अभिव्यक्तीत स्त्री जाणिवा आहेत. नववधू, तुझं अस्तित्व, माहेरची वाट, स्त्री मनाचा गुंता, तू होतीस तेव्हा या कविता स्त्री जाणिवा समृद्ध करणाऱ्या आहेत. त्यांनी विविध विषय हाताळल्याने त्यांच्या कवितेतल्या आशयाचे नाविन्य पटकन लक्षात येते. त्यांच्या कवितांतून घर, स्त्री आणि पुरुष उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आशयविशेषांवर भर दिला आहे. त्यांच्या कविता व्यापक आशय व अर्थक्षमता दर्शवणाऱ्या आहेत. त्यांच्या कवितेतील स्त्रीविषयक लेखन व चिंतन वाचकांना नवदृष्टी देणारे आहे.

बहिणाबाईंच्या लेवागणबोलीतील गाण्यांनी या बोलीभाषेला जागतिक पातळीवर ओळख मिळवून दिली आहे. लेवा गणबोलीचा अनमोल ठेवा आपल्याला लाभलेला असून तिचे संवर्धन आपण केले पाहिजे. लेवा गणबोली ही समृद्ध करायची असेल तर स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे. याच अनुषंगाने या काव्यसंग्रहात माणूसपन, माय मही म्हने, मायचं सपन अशा कविता आल्या आहेत.

त्यांच्या कविता म्हणजे स्त्री मनाच्या भावनांचा आविष्कार आहे. जीवनातल्या टप्प्यांत स्त्रियांना सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा, असुरक्षितता यांचे शब्दरूप दर्शन त्यांच्या कविता घडवतात. कविता ही त्यांची मैत्रीण आहे. स्त्रीपणाचे अनुभव घेतल्यावर त्यांची कविता जन्माला आली. स्त्री जीवनातील संवेदनशील भावना व हळवेपण त्यांच्या कवितेत झालेले आहे. एकूणच हा काव्यसंग्रह सर्वसमावेशक झाला आहे.

# बोस रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक !



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**डॉ.सर जगदीशचंद्र बोस हे एक भारतीय जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ तसेच पुरातत्त्वज्ञ होते. भारतीय महान शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांचे वनस्पती विषयावरील कार्य महान आहे. त्यांच्या अचाट संशोधनाबद्दलची अल्पशी पण रोचक माहिती श्री.एन. के.कुमार जी. यांच्या लेखनशैलीतून साभार. पूर्व बंगालमधील डाक्का जिल्ह्यातील राणीखल या खेडेगावात दि.३० नोव्हेंबर १८५८ रोजी जगदीशचंद्र बोस यांचा जन्म झाला. त्यांचे वडील भगवानचंद्र बसू हे सरकारी नोकरीत सब डिव्हिजनला ऑफिसर होते. त्या काळी इंग्रजीत जसे ठाकूरचे टागोर झाले, राय आडनावाचे रे झाले तसेच बसू आडनावाचे इंग्रजी स्पेलिंगप्रमाणे बोस झाले. त्यांचे घराणे हे बंगाल प्रांतातील एक खानदानी घराणे होते.**

त्यांची आई साध्वी व सुशील होती. लहानपणापासूनच जगदीशचंद्र आजूबाजूचा निसर्ग पहायचे व त्याचे निरीक्षण करायचे. निसर्गातील अनेक गोष्टी पाहून त्या अशाच का? असा प्रश्न त्यांना पडे. भगवानचंद्र सुद्धा न कंटाळता छोट्या जगदीशने विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देत असत. सर्व झाडे एकाच वेळी का फुले देत नाहीत? एखाद्या झाडाची पालवी पोपटी हिरवी पण दुसऱ्याची तांबूस असा फरक का पडतो? असे त्यांना वाटे. झाडे, फुले, फुलपाखरे, भोवतीचा निसर्ग आदींचे निरीक्षण करणे, हा त्यांचा आवडता छंद होता.

डॉ.जगदीशचंद्र बोस हे कोलकाता येथील सेंट झेवियर शाळा आणि त्याच नावाच्या महाविद्यालयात शिकले. त्यानंतर इंग्लंडच्या ख्राईस्ट चर्च महाविद्यालयातून भौतिकी, रसायन वनस्पतिशास्त्र आणि निसर्गविज्ञानाचा अभ्यास पूर्ण करून ते भारतात परत आले. या काळात त्यांना भौतिकशास्त्रज्ञ लॉर्ड रॅली यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ.बोस यांनी लिहिलेली पुस्तके- इरिटेबिलिटी ऑफ प्लँट्स, इलेक्ट्रो-फिजिओलॉजी ऑफ प्लँट्स, ट्रॉपिक मुव्हमेण्ट ॲण्ड ग्रोथ ऑफ प्लँट्स, दि नव्‍‌र्हस मेकॅनिझम ऑफ प्लँट्स, प्लँट रिस्पॉन्स, दि फिजिऑलॉजी ऑफ फोटोसिंथेसिस, दि मोटार मेकॅनिझम ऑफ प्लँट्स, रिस्पॉन्सेस इन दि लिव्हिंग ॲण्ड नॉन लिव्हिंग, लाइफ मुव्हमेण्ट्स ऑफ प्लँट्स- भाग १ ते ४ आदींचा समावेश आहे.

विद्युतशक्तीवरील संशोधनानंतर ते वनस्पतिशास्त्राकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तूतील साम्य आणि भेद याचा त्यांनी अभ्यास केला. स्नायू, मज्जातंतू, सुखदुःख आदी विकार यांचा वनस्पतीबाबत त्यांनी धांडोळा घेतला. डायामेट्रिकल कोन्ट्रॅक्शन ॲपरेटस, रेझोनंट रेकॉर्डर्स ही दोन उपकरणे तयार करुन त्यांनी त्यांच्या साहाय्याने थंडी, प्रकाश, विद्युत, उष्णता या घटकांचा वनस्पती व प्राणी यांच्यावरील परिणामांचा अभ्यास केला. वनस्पतींचे श्वसन, रुधिराभिसरण पद्धतीने होणारे त्यांच्यातील कार्य, अन्नाची ने-आण निरुपयोगी वस्तूंचा निचरा हे त्यांच्या संशोधनाचे विषय होते. वनस्पतीमध्ये होणाऱ्या सूक्ष्म बदलांची माहिती ठेवून त्याच्या नियमित नोंदी त्यांनी ठेवल्या. त्यावर संशोधन केले. त्यांच्या याच संशोधनातून वनस्पतींना संवेदना असतात हे त्यांनी सिद्ध केले. भारतीय वैज्ञानिक सोहिनी चक्रबोर्ती यांनी २०१६मध्ये प्रसिद्ध केलेल्या संशोधनातून ही प्रक्रिया उलगडून दाखविली आहे. वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी रेझोनंट रेकॉर्डर, ऑसिलेटिंग रेकॉर्डर, कंपाऊंड लेव्हलर, क्रेसकोग्राफ, बॅलिन्सिंग ॲपरेट्स आदी उपकरणे तयार केले. इंग्लंड व कोलकाता येथील प्रेसिडेन्सी महाविद्यालयात इ.स.१८८५ ते १९१५ अशी ३० वर्षे भौतिकशास्त्र विषय शिकवत असतानाच त्यांनी विद्युतशक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरंगांचा शोध घेऊन त्यांनी बॅटरी बनवली. या



शोधाची कीर्ती सर्वदूर पसरली. प्रसिद्ध शास्त्रज्ञ पोइंकर आणि जे.जे.थॉम्पसन यांच्या लिखाणात या शोधाचा उल्लेख आला आहे. नेमेलाइटच्या मदतीने संदेश पाठवण्यात त्यांना यश मिळाले होते. इ.स. १८९६मध्ये रेडिओ संदेश वहनाचे प्रयोग मार्कोनीने केले तर त्याच्या एक वर्षाआधीच जगदीशचंद्रजींनी ते केले होते. हे आता अमेरिकेस मान्य करावे लागत आहे. नेव्हिल फ्रान्सिस मॉट या संशोधकाने असे म्हटले होते की जगदीशचंद्र जगाच्या कमीत कमी साठ वर्षांनी पुढे आहेत. जगदीशचंद्रांनी आपले लक्ष धातू आणि वनस्पतींवर केंद्रित केले. रेडिओतरंगांची स्पंदने जाणू शकेल असे कोहेरर नावाचे उपकरण त्यांनी तयार केले. सततच्या वापराने धातूची संवेदनशीलता कमी होते. जर त्यांना थोडी विश्रांती दिली तर संवेदनशीलता पुन्हा पूर्ववत होते. वनस्पतींमध्ये अन्नरस ऊर्ध्व दिशेने वाहून नेले जातात. या क्रियेत विद्युतयांत्रिकी स्पंदनांचा सहभाग असतो, असे प्रतिपादन जगदीशचंद्रांनी केले. ही स्पंदने मोजता येतील असे क्रेस्कोग्राफ नावाचे यंत्रही त्यांनी बनविले. तकेच नव्हे तर सुमधुर संगीताचा वनस्पतींच्या वाढीवर परिणाम होतो, त्यांची वाढ जास्त चांगल्या प्रकारे होते व कर्कश आवाजात त्यांची नीटशी वाढ होत नाही हे ही त्यांनी सिद्ध केले.

डॉ. सर जगदीशचंद्र बोस यांनी सन १९१७ मध्ये कोलकाता येथे बोस रिसर्च इन्स्टिट्यूट नावाची संस्था स्थापन करून एक मुखपत्रही सुरू केले. १९२० मध्ये त्यांना रॉयल सोसायटीचे सभासदत्व देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांचे वयाच्या ७९व्या वर्षी दि.२३ नोव्हेंबर १९३७ रोजी निधन झाले. !!

# प्रतापगड म्हणजे 'शौर्य किल्ला'



आधुनिक केसरी

जखमी छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर परत येताच त्याने आपल्या सैन्याला, ज्यांपैकी बरेच जण किल्ल्याच्या खाली जंगलात लपलेले होते, त्यांना प्रहार करण्याचा आदेश दिला. आदिलशाही माघारली आणि मराठा सैन्याने पाठलाग करून शत्रूंना प्रतापगडापासून पुढे ढकलले आणि अखेरीस 23 आदिलशाही किल्ले ताब्यात घेतले. प्रतापगडाच्या लढाईत छत्रपती शिवाजी महाराजांचा विजयचा पराक्रमी संकेत होता, आणि ते बीज बनले ज्यापासून मराठा साम्राज्याचा लवकरच विकसित झाला. प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी, जिथे अफजल खान यांची समाधी आजही आहे. आणि अफजल खााचे शीर राजगडाच्या बुरुजांमध्ये मध्ये शिरले आहे. प्रतापगड किल्ल्याची उंची 1080 मीटर मध्ये इतकी आहे. गडाच्या दक्षिणेच्या टेहळणी बुरुजाखालून सरळ जाणाऱ्या पायवाटेने आपण थोड्या वेळातच तटबंदीत लपविलेल्या पश्चिमाभिमुख महादरवाज्यात येऊन पोहोचतो. वैशिष्ट्य म्हणजे शिवकालीन रितीप्रमाणे आजही हा दरवाजा सूर्यास्तानंतर बंद ठेवला जातो व सूर्योदयापूर्वी उघडला जातो. महादरवाज्यातून आत गेले की उजव्या हातालाच चिलखती बांधणीचा बुरूज दिसतो. चिलखती बुरूज पाहून परत पायऱ्यांच्या मार्गाने भवानी मंदिराकडे जाता येते. मंदिरात भवानीमातेची सालंकृत प्रसन्न मूर्ती आहे. ही मूर्ती महराजांनी नेपाळमधील गंडकी नदीतून शाळिग्राम शिळा आणून त्यातून घडवून घेतली. भवानी देवीच्या नगरखान्याची खिडकी उघडून पाहिल्यानंतर देवीचा चेहरा दिसतो. या देवीचीही एक कथा सांगितले जाते. शिवाजी महाराजांनी या देवीसाठी रोज सनई चौघडा वाजविण्याची प्रथा सुरू केली होती. हडप आडनावाचा पुजारी तिला पंचामृतासह नैवेद्य दाखवीत असे.

भवानी मातेचे मंदिराला लागून शिवलिंग आणि हंबीरराव मोहिते यांची तलवार आहेत. भवानी देवीच्या मंदिरासमोरून बालेकिल्ल्याकडे चालू लागल्यास उजव्या हाताला समर्थस्थापित हनुमानाची मूर्ती दिसते. पुढे बालेकिल्ल्याचे प्रवेशद्वार ओलांडल्यानंतर आपण केदारेश्वर महादेवाच्या मंदिराजवळ येऊन पोहोचतो. मंदिरात भव्य शिवलिंग आहे. केदारेश्वर मंदिराच्या मागील बाजूस राजमाता जिजाबाईच्या वाड्याचे अवशेष आहेत. किल्ल्याला महादरवाज्याखेरीज घोरपडीचे चित्र असणारा राजपहाऱ्याचा दिंडी दरवाजा आहे. त्याच्या जवळ रेडका बुरूज, पुढे यशवंत बुरूज, तर त्याच्यापुढे सूर्य बुरूज हे बुरूज आहेत. प्रतापगड किल्ला हा महाबळेश्वर पासून 23 किलोमीटरवर आहे. महाबळेश्वर पासून प्रतापगडावर जाण्यासाठी तुम्ही स्वतःच्या गाडीने सुद्धा जाऊ शकतात.प्रतापगड किल्ल्याची माहिती व्हिडिओ मध्ये बघण्यासाठी खाली तुम्ही बघू शकता.

# शिवाजी महाविद्यालयास छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार

## राज्यात तृतीय तर औरंगाबाद विभागातून प्रथम पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील गौताळा अभयारण्याच्या कुशीत असणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयास राज्यस्तरीय तृतीय तर औरंगाबाद विभागातून सर्वप्रथम असे दोन पुरस्कार जाहीर झाले आहेत.

महाराष्ट्र शासनच्या महसूल व वन विभागामार्फत दिला जाणारा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार राज्यातील सामाजिक वनीकरणाच्या वने इतर क्षेत्रातील वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना सन्मानित करण्यासाठी सन 1988 पासून वनश्री पुररकार दिले जातात. राज्यातील कोरोनाच्या पार्श्वभूमी मुळे 2018 व 2019 चे पुरस्कार आज पर्यंत जाहिर झाले नव्हते, दि.17 नोव्हेंबर, 2022 रोजी छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार, 2018 ची घोषणा महाराष्ट्र शासनाने केली असून औरंगाबाद विभागातून प्रथम पुरस्कार, रक्कम 50,000/- तर राज्यस्तरातून तृतीय पुरस्काराची रक्कम 50,000/- असे एकूण एक लाख रुपयांचे पुरस्कार महाविद्यालयास प्राप्त झाले आहेत. 1986 मध्ये महाविद्यालयीन परिसर, ओसाड, उजाड आणि खडकाळ होता. या जमिनीवर कोणतेही झाडे वा वेली येत नसत तेव्हा संस्थेने 20 वर्षापूर्वी अंबाडी प्रकल्पातील गाळ विकत घेतला आणि महाविद्यालयीन परिसरामध्ये टाकण्यात आला, त्यावर महाविद्यालयीय बावीस एकरच्या परिसरात नियोजन पूर्वक



हजारो झाडे लावली. या झाडांमध्ये नारळ, फणस, जांभुळ, लिंब, साग, पिंपळ, वड, चंदन, शेवगा, नीलगिरी, शिसम, आपटा, सीताफळ, आवळा, पळस, गोकर्ण, बेहडा, आडुळसा, मोह, धावडा, करवंद, चाफा, टेंभुर्णी आदी हजारो वृक्ष व वेलींना परिसरात आहेत, त्यामुळे परिसर निसर्गमय झाला असून तो फळे, फुले आणि हिरवाईने बहरला आहे. तसेच 'ऑक्सिजन पार्क ' बनला आहे. त्यामुळेच शासनाचे हे दोन पुरस्कार महाविद्यालयास प्राप्त झाले आहेत.

या यशामागे महाविद्यालयातील एन. सी.सी. विभाग, एन.एस.एस विभाग, व सर्व सेवक, प्रयोगशाळा परिचर, कार्यालयातील कर्मचारी, सर्व प्राध्यापक तसेच सतत प्रोत्साहन देण्यासाठी तत्पर असलेले संस्थाचे अध्यक्ष मा. श्री. मानसिंहजी पवार, उपाध्यक्ष मा. श्री. अशोकरावजी आहेर तसेच संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, त्याचबरोबर महाविघालयाचे प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले सर, कॅप्टन प्रा. व्ही. के. देशमुख सर , उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर सर यांचे विशेष प्रयत्न व मार्गदर्शन आहे

# वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांचे महत्वपूर्ण प्रश्न सरकार दरबारी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांचे प्रशासन, कंत्राटदार च्या संदर्भातील प्रलंबित प्रश्नावर महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) मा श्री चंद्रकांत राऊत कामगार उपायुक्त औरंगाबाद यांच्या कडे वाचा फोडून कंत्राटी कामगारांना न्याय द्यावा अन्यथा दि २१डिसेंबर रोजी मंत्रालय मुंबई भव्य मोर्चा काढणार असल्याचे प्रतिपादन संघटनेचे अध्यक्ष नीलेश खरात व सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केले आहे.

वीज उद्योगात रिक्त पदांवर सातत्याने व नियमितपणे कंत्राटी कामगार गेल्या १५-१६ वर्षांपासून सातत्याने व नियमितपणे कार्यरत आहेत. या कामगारांना किमान वेतन व २० % वेतन, वेळेवर देण्यात यावे, कंत्राटदार कामगारांच्या वेतना मधुन विविध नावा खाली कामगारांच्या कडून दरमहा पैशाची मागणी करणे, पैसे न देणाऱ्या कामगारांवर बेकायदेशीर पणे कारवाई करून कामावरून कमी करणे, आकसापोटी त्यांची दूर अंतरावर बदली करणे. PF व ESIC बाबतीत अनियमिता, कुठल्याही कायद्याला न जुमानण्याची प्रशासन व कंत्राटदारांची प्रवृत्ती, कंत्राटदार बदलल्यावर पुन्हा कामगार कामाला घेण्यासाठी हजारो रूपयांची मागणी करणे, मा औद्योगिक न्यायालय बांद्रा मुंबई व्दारे नोकरीत संरक्षित कामगारांना कामावर न घेणे, दिवाळी बोनस रक्कम ,ई प्रशासन पातळीवर प्रश्नांबाबतीत दि २१ नोव्हेंबर रोजी कामगार उपायुक्त यांच्या समावेत त्रिपक्षीय बैठक झाली. या वेळी संघटनेने यावेळी धोरणात्मक बाबतीत DBT व्दारे वेतन, ओडिसा, हरियाणा सरकारने घेतलेले निर्णय, कंत्राटदार मुक्त रोजगार, नोकरीत स्थैर्य, या बाबतीत सविस्तर माहिती देवून अशी योजना महाराष्ट्र सरकारने घेवून महाराष्ट्र राज्यातील वीज ऊद्योगातील कंत्राटी कामगारांना न्याय द्यावा अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे. २१ डिसेंबर २०२२ रोजी मंत्रालय मुंबई येथे भव्य मोर्चामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष खरात यांनी केले आहे. यावेळी कामगार ऊपायुक्त कार्यालय वतीने मा कामगार उपायुक्त औरंगाबाद चंद्रकांत राऊत,सहाय्यक कामगार आयुक्त श्री पडियाल, कामगार अधिकारी अमोल जाधव, महावितरण प्रशासनाच्या वतीने औरंगाबाद प्रादेशिक संचालक कार्यालयाचे सह उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वासजी पाटील महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांचे अध्यक्ष निलेश खरात सरचिटणीस सचिन मेंगाळे, सह संघटन मंत्री तात्यासाहेब सावंत, सुशील ऊपळकर, अन्सार खान, अशोक खंडागळे, माधव हिवराळें, यशवंत दिपके, रवी साखरे व अन्य प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.






# योगाचार्य गंगाप्रसाद खरात दिल्ली येथे राष्ट्रीय योगवीर पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय योग शिक्षक महासंघ देशातील सर्व राज्यात योगशिक्षण आणि योगशिक्षक यांच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यरत असून महासंघाच्या वतीने नऊ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय योग वीर सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, सदरील पुरस्कार हा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष योग गुरु मंगेश त्रिवेदी जी, केंद्रीय आयुष राज्यमंत्री डॉ मुंजापरा महेंद्र भाई, मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योगाचे संचालक डॉक्टर ईश्वर बसवा रेड्डी तसेच केंद्रीय शहर विकास मंत्री कौशल किशोरजी यांच्या उपस्थितीमध्ये देण्यात आला आहे. योग गुरु गंगाप्रसाद खरात यांनी कोरोनाच्या कालावधीमध्ये विविध शिबिरे, कार्यशाळा यांच्या माध्यमातून रुग्णांचे मनोबल वाढवण्यासाठी ऑनलाइन व्याख्यानासोबतच प्रतिकारशक्ती आणि फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी योगासन, प्राणायाम आणि योगनिद्रा व ध्यान यासारखे अनेक वर्ग घेतले आहेत.

गंगाप्रसाद खरात हे एमजीएम विद्यापीठात योग विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून तज्ञ मार्गदर्शक म्हणून विविध शाळा ,महाविद्यालय, प्रशासकीय कार्यालयामध्ये योग प्रसार आणि प्रचाराचे अविरत असे काम करीत आहे. या क्षेत्रातील कामाची दखल घेऊन अखिल भारतीय योगशिक्षक महासंघा तर्फे योग गुरु गंगाप्रसाद खरात यांना राष्ट्रीय योग वीर पुरस्काराने दिल्ली येथील विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले आहे. या विशेष पुरस्काराबद्दल त्यांचे योग आणि क्रीडा क्षेत्रातील व्यक्ती, विद्यार्थी आणि मित्रमंडळी यांनी अभिनंदन केले आहे.

# एम.आय.एम.चे आंदोलन म्हणजे स्टंटबाजी

## सोशिअल मीडियावर आ. सतीश चव्हाणांचे पत्र होतेय व्हायरल

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथे एम.आय.एम पक्षाच्यावतीने आ. सतीश चव्हाण यांच्या विरोधात काल मंगळवारी भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते कारण काही महिन्यांपूर्वी आ.सतीष चव्हाण यानी लासूर स्टेशनच्या वॉर्ड क्रमांक एक व सहा तसेच मुस्लिम कब्रस्तानात सिमेंट रस्ता, संरक्षक भिंत व पेव्हरब्लॉकचे रस्तेचे उद्घाटन करण्यात आले होते मात्र अद्यापर्यंत काहीहि काम झालेले नसून कामाला सुरुवातही झालेली नसल्याने एम आय एम च्या वतीने आंदोलन करण्यात आले मात्र सोशिअल मीडियावर सतीश चव्हाण यांच्यावतीने या आंदोलनाला उत्तर म्हणुन एक पत्र सोशिअल मीडियावर व्हायरल होत असून त्यात त्यांनी म्हटले आहे कीं शिंदे फडणवीस सरकार अस्तित्वात आल्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात केलेल्या विकासकामांना शिंदे भाजप सरकारने कात्री लावली असून विकासकांमाना स्थागिती आदेश शासन निर्णय क्रमांक विकास 2022 / प्र.क्र.227/योजना 6 दिनांक 12 ऑक्टोबर 2022 अन्वये राज्यातील सगळी विकासकामे रद्द केली आहेत त्यामुळे एम.आय.एमने माझ्याविरुद्ध आंदोलन न करता विकासकाम रद्द केलेल्या शिंदे/भाजप सरकारच्या विरुद्ध मोठे जनआंदोलन उभारावे व रद्द केलेले विकासकामे आंदोलनाच्या जोरावर मंजूर करून आणावेत उगाच आंदोलनाची स्टॅण्टबाजी करून स्वतःचे व एम.आय.एम पक्षाचे हसे अपुऱ्या माहितीच्या आधारे करून घेऊ नये.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात केलेल्या विकासकामांना शिंदे भाजप सरकारने कात्री लावली असून सर्व विकासकामे रद्द केली . शासन निर्णय क्रमांक विकास 2022 /प्र .क्र .227/योजना 6 दिनांक 12 ऑक्टोबर 2022 अन्वये सगळी विकासकामे रद्द केली आहेत त्यामुळे एम .आय .एमने आ . सतीश चव्हाण यांच्याविरुद्ध आंदोलन न करता विकासकाम रद्द केलेल्या शिंदे/भाजप सरकारच्या विरुद्ध मोठे जनआंदोलन उभारावे व रद्द केलेले विकासकामे आंदोलनाच्या जोरावर मंजूर करून आणावेत . उगाच प्रसिद्धीच्या हव्यास्यासाठी आंदोलन करू नये व लासूर स्टेशनच्या विकासासाठी त्यांच्या पक्षाचे खासदार इम्तियाज जलील यांच्या विकास निधीतून भरीव निधी मंजूर करून आणून लासूर स्टेशनच्या विकासाच्या वैभवात भर घालावी .

---

आ . सतीश चव्हाण यांचे आंदोलनानंतर जे पत्र सोशिअल मीडियावर व्हायरल होत आहे ते म्हणजे ताकाला जाऊन भांडे लपवण्यासारखा केविलवाणा प्रयत्न आहे . मग वर्कऑर्डर न घेता उदघाट्नाची घाई कश्यासाठी असा सरळ प्रश्न आहे तरीही मराठवाड्यात अश्याप्रकारे आ . चव्हाण यानी जर नुसते कामाचे उदघाट्न केलेले असतील व प्रत्यक्षात कामे पूर्ण झालेली नसतील तर माझ्याशी संपर्क साधावा एम आय एम च्या वतीने त्याठिकाणी जाऊन आंदोलन करण्यात येईल . **अजित जाधव ( तालुकाउपाद्यक्ष,एम .आय .एम, गंगापूर )**



संत दासगणू महाराज यांच्या जयंतनिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे संत दासगणू महाराज यांचे गुरू घर श्री साई संस्थान शिर्डी यांचे मार्फत संत दासगणू महाराज यांच्या समधीस वस्त्र परिधान करण्यात आले. याची सुरवात श्री साई संस्थान शिर्डीचे विश्वस्त सुरेश वाबळे यांनी केली. वस्त्र समर्पण करण्यासाठी साई संस्थानचे उल्हास गुरु महाराज, मंदिर प्रमुख चौधरी साहेब, जनसंपर्क कार्यालयाचे सुरेश शिंदे, चोखदार नामदेव ढोमे यांचे हस्ते परिधान करण्यात आला. यावेळी संत दासगणू महाराज प्रतिष्ठानचे विश्वस्त विनायक नांदेडकर, गोविंदराव शिरुरकर, विक्रम महाराज, गोरठेकर परिवारतर्फे सुभाष देशमुख यांनी प्रतिष्ठानतर्फे सर्व मान्यवरांचा सत्कार केला. साई संस्थान शिर्डीतर्फे संत दासगणू महाराज भक्त मंडळ उमरी (गोरठे)ते शिर्डी पदयात्राचे विष्णूभाऊ अट्टल व अशोक मामीडवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गोविंद नलबलवार, मनोज कोटगीरे, श्याम भाऊ तम्मेवार, नरसिंग मुक्कावर, शिवा गोडगे, रामदास टेकाळे व गावकरी हजर होते.

# अवैध बायोडिझेलनिर्मितीच्या अड्ड्यावर छापा

## दिंडोरी तालुक्यातील घटना, एक कोटीचे इंधन जप्त, जानोरी एमआयडीसीत पोलीसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील जानोरी एमआयडीसी मधील अवैध बायोडिझेल निर्मितीच्या साठ्यावर पोलिसांची धाड एक कोटी रुपयाचा अवैध इंधन जप्त दिंडोरी - तालुक्यातील जानोरी एमआयडीसी मधील एका बायोडिझेल निर्मिती कारखान्यावर नाशिक ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत एक कोटी एक लाख रुपयाचा अवैध डिझेल सदृश्य ज्वलनशील पेट्रोलियम पदार्थाचासाठा जप्त केला आहे याबाबतचे वृत्त असे की नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी सध्या जिल्हाभर अवैध धंद्याविरोधात मोठी शोध मोहीम राबवली असतानाच दिंडोरी तालुक्यातील जानोरी शिवारातील एमआयडीसीमध्ये एका पत्र्याच्या शेडमध्ये बायोडिझेलचा अवैध साठा असल्याची माहिती पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून मिळताच नाशिक ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखालील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह जानोरी एमआयडीसी मधील कान्हा इंटरप्राईजेस गट क्रमांक 599 /3 प्लॉट नंबर 16 मध्ये एका पत्र्याच्या शेडमध्ये काही इसम अवैधरित्या डिझेल सदृश्य पदार्थांमध्ये एक ज्वलनशील पदार्थाची भेसळ करीत असताना रंगेहात पकडले यावेळी संशयित आरोपी अनिल भवानभाई राधाडिया (वय 37) रा सुरत गुजरात, दीपक सूर्यभान गुंजाळ (वय 41) रा प्लॉट नंबर 13 आर्या हाईट्स कोणार्क नगर नाशिक, इलियास सज्जाद चौधरी (वय 43) वाहन चालक, रा. कुर्ला कलिना मेहबूब चाळ, रूम नंबर 15, रा. सोना ता तारागंज जिल्हा गोंडा उत्तर प्रदेश, अब्रार अली शेख वय (37) क्लीनर, रा. शिवडी मुंबई अजहर इब्रार हुसेन अहमद (वय 21 ) रा नरसिंग गड ता राणीगंज जि प्रतापगड उत्तर प्रदेश ह्या पाच इसम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गिनॉल -1214/30 H C बल्क नावाचे केमिकल व MADSO B80 या नावाचे केमिकल असून यांचे विनापरवाना बेकायदेशीर पेट्रोलियम विभागाचा कोणताही आवश्यक तो परवाना न घेता तसेच मानवी जीवनात धोका पोहोचल अशा रीतीने एकत्रित रित्या मिश्रण करून त्यातून डिझेल सारख्या ज्वलनशील पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने तयार करताना मिळून आले त्यांच्या ताब्यातून दोन टँकर क्रमांक GJ 12 BZ 8825 व MH 43 BG 7967 या क्रमांकाचे दोन केमिकलने भरलेले टँकर व प्लॅस्टिक टाक्या भरलेले ज्वलनशील पदार्थ व इतर साहित्य असा 10168240 /- अक्षरी एक कोटी एक लाख अडूस्टट हजार दोनशे चाळीस रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वरील पाच इसमांना ताब्यात घेतले आहे व त्यांच्याविरुद्ध दिंडोरी पोलिसात अवैधरित्या डिझेलसारखा सदृश्य ज्वलनशील पदार्थ बाळगून मानवी जीवितास धोका निर्माण होईल असे कृत्य केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकांत पाटील संदीप जगताप दीपक अहिरे, गिरीश बागुल, विनोद टिळे यांच्या पथकाने ही कारवाई केली. त्यानंतर दिंडोरी पुरवठा निरीक्षक अक्षय लोहारकर जानोरी गावचे तलाठी किरण भोये यांनी याबाबत पंचनामा केला. वरील घटनेचा अधिक तपास दिंडोरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग कावळे, संदीप धुमाळ करीत आहे.



**जानोरी एमआयडीसीमध्ये अवैध धंद्याचा तिसऱ्यांदा पर्दाफाश**

जानोरी एमआयडीसी मध्ये अनेक कंपन्या व वेअर हाऊस असून त्यामध्ये यापूर्वी देखील बेकायदेशीर गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये रेशन च्या अवैध गव्हाचा साठा जप्त करण्यात आला होता तसेच या परिसरातील एका कंपनीत बोगस सॅनिटायझर निर्मितीचा कारखाना देखील सापडला होता .अवैध इंधनाचा साठा सापडण्याची ही तिसरी घटना असून याबाबत स्थानिक प्रशासनाला कुठलेही माहिती नसल्याचे निदर्शनास आले आहे तरी प्रशासनाने सर्वच केमिकल कंपन्या व वेअर हाऊस यांची चौकशी करावी अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे

# मोलखेडा येथे हंगामात शेतीपंपासाठी दिवसा लाईट देण्याची मागणी



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना हिवाळ्यात तीन महिने शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी दिवसा लाईट देण्याची मागणी सरपंच ज्ञानेश्वर वारांगणे व ग्रामपंचायत सदस्य यांच्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे. नुकताच शेती पिकांचा रब्बीचा हंगाम सुरू झाला आहे. या हंगामात शेतकऱ्यांकडून गहू, कांदा,भुईमूग, हरभरा व भाजीपाला मासारखी पिके घेतली जातात. बहुतेक पिकांना सारा पद्धतीने पाणी चावे लागते. त्यामुळे सदर पिकांना शेतात उभे राहूनच पाणी द्यावे लागते. हिवाळ्यात दवबिंदू होण्यापर्यंत तापमान खाली जाते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना रात्री पिकांना पाणी देणेकरीचे व त्रासदायक बनले आहे. हिवाळ्यातील डिसेंबर आणि जानेवारी या दोन महिन्यांत बऱ्याच जिल्ह्यामध्ये तालुक्यामध्ये तापमान हे तीन ते चार अंश इतके कमी झाल्याचे पाहावयास मिळालेले आहे. अशा परिस्थितीत आहे.रात्री कडाक्याच्या थंडीत शेतीपिकांना पाणी देताना शेतकऱ्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. शेतकऱ्यांना विविध शारीरिक आजार होत आहेत. शेतकन्यांना शेतीसाठी दिवसा बारा तास लाईट मिळावी ही मागणी ब-याच वर्षापासून होत तथापि सरकारने हिवाळ्याच्या तीन महिन्यांच्या कालावधीत तरी शेतीसाठी दिवसा लाईट पुरवावी, जेणेकरून शेतकऱ्यांचा त्रास व कष्ट कमी होतील, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य व सरपंच ज्ञानेश्वर वारांगणे यांच्या वतीने करण्यात आली आहे. मागणी मान्य न झाल्यास कृषी मंत्र्यांच्या सोयगाव तहसील कार्यालय तहसील येथे व सावळदबारा ३३ केव्ही उपकेंद्र महावितरण सावळदबारा येथे मोर्चा काढण्यात येईल यामध्ये सावळदबारा व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार अशे निवेदने देण्यात आले आहे. यावेळी मोलखेडा येथील रवींद्र गायकवाड, उपसरपंच गुलाबसिंग राणा,स्वानंद पाटील, गणेश काटे, तंटामुक्ती अध्यक्ष, अतुल इंगळे,अमोल शेळके, वैभव गायकवाड, भूषण राणा, ज्ञानेश्वर मखसर,अनंता गायकवाड, गणेश शिनगारे, यांची उपस्थिती होती.

# मत्सोदरी'त गुणवंताचा सत्कार; राजूर येथील अंजली पुंगळे अभियांत्रिकी परीक्षेत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मूळची राजूर येथील परंतु जालना येथे मत्सोदरी महाविद्यालयात शिक्षण घेत असलेली कु.अंजली दत्तात्रय पुंगळे या विद्यार्थिनीने अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले.त्याबद्दल माजी आरोग्यमंत्री आ.राजेश टोपे यांनी तिचे कौतुक केले असून सौ.मनीषाताई टोपे व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालय औरंगाबाद विभागाचे माजी सहसंचालक डॉ.महेश शिवणकर यांच्या हस्ते कु. अंजली पुंगळे हिस प्रोत्साहनपर पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. नुकताच जालना येथे मत्सोदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात पालक मेळावा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.यावेळी मत्सोदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी.आर.गायकवाड, प्राचार्य डॉ. एस.के.बिरासदार, उपप्राचार्य प्रा. रवींद्र करवंदे, विभाग प्रमुख डॉ. डी.एम. सोळंके, डॉ.सुजाता पाटील, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. अंजली पुंगळे हिच्या यशाबद्दल बाबुराव मामा खरात, आबाराव मामा खरात,सांडू अण्णा पुंगळे, कैलास पाटील पुंगळे, श्रीराम पंच, शिवाजी अण्णा पुंगळे, भिकन डवले, भगवान पुंगळे, मुसा शेठ सौदागर, अरविंदराव थोटे, दत्तात्र्य पुंगळे, आर.आर. पाटील नामदेव पुंगळे यासह अनेकांनी कौतुक केले.






# पिशोर साखर कारखान्याचे भाग भांडवलचे चेक वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** येथील हिराजी बाबा साखर कारखान्याचे शेअर्स जमा केले होते. परंतु काही कारणास्तव कारखाना उभारला गेला नाही. त्याची विक्री झाली .परंतु भाग भांडवल गुंतवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांचे काय झाले त्यांना त्यांचे पैसे परत मिळावे यासाठी आम्ही प्रयत्न केले व महाराष्ट्रात प्रथमच कारखाना विक्री झाल्यानंतर शेतकरयांना भाग भांडवल परत मिळाले असे ॲड. कृष्णा जाधव यांनी नागद येथे चेक वाटप प्रसंगी सांगितले.या प्रसंगी आलेल्या अतिथी यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.या वेळी ॲड कृष्णा जाधव माजी व्हॉईस चेअरमन हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या. पिशोर, आर टी शेळके शासकीय अभी हस्ता ,लालमिया शहा, विजय सुर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला.सुभाष महाजन, नंदलाल बेदमुथा, बबलू पाटील, दिनकर पाटील, विजय सुर्यवंशी,संदीप पाटील, राजधर अहिरे, भोला महाजन, नंदलाल छान वाल, व ग्रामस्थ भाग भांडवल दार मोठ्या सख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच सुभाष महाजन यांनी केले तर आभार मनोज पाटील यांनी मानले.

# एक मुक्काम मुख्यालयी उपक्रमातून 25 लाखांच्यावर करवसुली

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यात अनोखा उपक्रम गट विकास अधिकारी यांच सर्व स्तरातून होत आहे कौतुक जागतीक शौचालय दिनानिमित्त कन्नड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे हे स्वताः नादरपुर ग्रामपंचायतीला मुक्कामी राहीले व सर्व ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांना दि.18 रोजी ग्रामपंचायतला मुख्यालयी रहाण्याचे आदेश दिले तसेच त्यांच्यासोबत पंचायत समिती स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक यांची निरिक्षक म्हणुन नेमणुक केली. या उपक्रमात सार्वजनीक व वैयक्तीक स्वच्छता, शौचालयाचा वापर, प्लास्टीक कचऱ्याचे व्यवस्थापन, वृक्षलागवड, करवसुली आदी विषयांवर प्रभातफेरी काढुन व गृहभेटी देउन जनजागृती करण्यात आली. गटविकास अधिकाऱ्यांच्या या विशेष व अनोख्या उपक्रमाला ग्रामस्थांनीही चांगला प्रतीसाद देत स्वयंस्फुर्तीने सक्रीय सहभाग नोंदवला व 25 लाखांच्या वर कराचा भरणा केला त्यामुळे या उपक्रमाची जिल्हाभर चर्चा होत आहे.



# सरकारला शेतकऱ्यांसोबत चर्चाच करायची नाही

## अजित पवार : सरकारने जलसमाधी घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर येऊ देता कामानये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** या सरकारबद्दल शेतकर्‍यांच्या मनात फार मोठी नाराजी आहे. या सरकारने जलसमाधी घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर येऊ देता कामा नये. आम्ही सरकारमध्ये असताना आंदोलनाची भूमिका कुणी मांडली तर त्यांच्याशी चर्चा करत होतो मात्र आताच्या सरकारला शेतकऱ्यांसोबत चर्चाच करायची नाही ही भूमिका लोकशाहीमध्ये, सरकारमध्ये ठेवणे हे अतिशय चुकीचे आहे त्यामुळे सरकारने त्यांना वेळ दिला पाहिजे असे रोखठोक मत राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विधानभवनात घेतलेल्या पत्रकार परिषदेत मांडले.
ऑक्टोबरमध्ये जो परतीचा पाऊस झाला त्या पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यातून शेतकऱ्यांना जी मदत मिळायला हवी होती तशी मदत मिळताना दिसत नाही. एकतर पीकविम्याचे पैसे इतके तुटपुंजे मिळत आहेत की, शेतकऱ्यांना जी पीक विम्याची रक्कम जो विमा उतरवला आहे तो जवळपास दीड ते दोन हजार रुपयांचा आहे आणि त्यांच्या खात्यात फक्त ७० - ९० रुपये आले आहेत. यासंदर्भात केंद्रसरकारची मदत घेऊन या विमा कंपन्यांना ऐकायला भाग पाडण्यासाठी गरजेचे आहे. यासंदर्भात काही शेतकरी कोर्टात गेले आहेत. शेतकऱ्यांचा पीक विमा राज्यसरकार काढत असते त्याला काही प्रमाणात केंद्रसरकारची मदत होत असते. त्यावेळी शेतकऱ्यांना स्वतः च्या पीक विम्याच्या पैशासाठी कोर्टात जाण्याची वेळ सरकारने येऊ देऊ नये. सरकारने त्यामध्ये पुढाकार घेतला पाहिजे. आणि वेळ पडली तर केंद्रसरकारला हस्तक्षेप करायला सांगितले पाहिजे. त्यातून शेतकऱ्यांना मदत झाली पाहिजे अशी मागणीही अजित पवार यांनी केली.
शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होत नाहीयत. तुपकर यांनी मला सरकारकडे वेगवेगळ्या मागण्या केल्याचे सांगितले. त्यांची एवढीच इच्छा आहे की या मागण्यांसंदर्भात भूमिका घेतली आहे तर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी वेळ द्यावा व बैठक आयोजित करावी अशी मागणी आहे. यासंदर्भात आजच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना पत्र देणार आहे असेही अजित पवार म्हणाले. राजू शेट्टी यांनी ऊसासंदर्भात आंदोलन केले. सरकारने लक्ष घातले नाही तर टोकाची भूमिका घ्यावी लागेल असा इशारा दिला आहे. शेतकरी नेते असो किंवा शेतकऱ्यांच्या संघटना असोत किंवा शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारा पक्ष असो यांच्याकडून शेतकऱ्यांसंदर्भात मागण्या येतात त्यावेळी अतिशय समंजस भूमिका सरकारने घेतली पाहिजे. असे स्पष्ट मतही अजित पवार यांनी व्यक्त केले. सध्या रब्बीचा हंगाम सुरू



झाला आहे. मोठ्याप्रमाणावर पाण्याची गरज आहे. ऑक्टोबरअखेरपर्यंत पाऊस पडला. त्यावेळी पिकाला पाण्याची गरज नव्हती. आता उन्हाची तीव्रता वाढली आहे आणि थंडीही वाढली आहे. एकीकडे रात्री थंडी आणि दिवसा उन्हाची तीव्रता त्यामुळे पिकांना पाणी लागत आहे आणि त्याचवेळी शेतकऱ्यांच्या वीज जोडण्या तोडण्याचा धडक कार्यक्रम सुरू झाला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगत आहेत आम्ही आदेश दिले आहेत परंतु त्याची अंमलबजावणी ग्रामीण भागात अधिकारी वर्ग करताना दिसत नाही. त्याच्याऐवजी आदेश काढले तर लोकप्रतिनिधी, शेतकरी ते आदेश त्या अधिकार्‍यांना दाखवतील. याबाबत तातडीने सरकारने भूमिका घ्यायला हवी. यातून शेतकरी हवालदिल झाला आहे, हैराण झाला आहे. निर्णय जाहीर सरकारने केला तरी अंमलबजावणी झालेली नाही. अधिकारी वर्ग आडमुठेपणा घेत आहे याचीही नोंद सरकारने घ्यायला हवी अशी मागणीही अजित पवार यांनी केली. राज्यात थंडी वाढली आहे. त्यामध्ये काहींचा मृत्यू झाला आहे अशा बातम्या आहेत. राज्यसरकारने शेतकरीवर्गाला कृषी विभागाच्या माध्यमातून थंडीचा जोर राहणार आहे, त्याचा अवधी किती आहे, त्याकरीता कुठली पीकं, भाजीपाला, फळे व इतर पिकांची काय काळजी घेतली पाहिजे हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. कारण ते माझ्या शेतकऱ्यांच्या लक्षात येत नाही. त्यांचे उपजीविकेचे साधन ज्या रब्बीच्या पिकांवर अवलंबून आहे त्याबाबत कृषीविभागाने व सरकारने पत्रक काढले पाहिजे अशी मागणीही अजित पवार यांनी केली. सरकारने काय करावं हा सरकारचा निर्णय आहे परंतु शेजारच्या राज्यात निवडणूका आहेत म्हणून आपल्या राज्यातील ठराविक जिल्हयात पगारी सुट्टी जाहीर केली आहे हे पहिल्यांदाच पहायला मिळाले. दर पाच वर्षांनी निवडणूका येतात परंतु मला कधी आठवत नाही. आम्ही सरकारमध्ये काम करत असताना शेजारच्या राज्यात निवडणूका लागल्या तर सुट्टी दिली आहे. हा आपण संसदेची निवडणूक समजू शकतो. पण असे आदेश पहिल्यांदा काढले हे पहायला मिळत आहे. वास्तविक असे नवीन पांयडे पाडणे चुकीचे आहे असे स्पष्ट मतही अजित पवार यांनी व्यक्त केले.
मुळात ३६५ दिवसात जवळपास सर्वच प्रकारच्या पगारी, आजारी सुट्टया असतात त्या जवळपास पावणेदोनशे सुट्टया आहेत. ५२ आठवडे ५२ आणि ५२ झाले एकशे चार आणि शनिवार रविवार म्हणजे एकशेसहा सुट्टया तिथेच गेल्या. शिवाय सण, महापुरुषांच्या जयंत्या यामध्ये गांभीर्याने विचार केला पाहिजे राज्याचा गाढा हाकताना इथे काम करणारा अधिकारी, कर्मचारी हा जर सहा महिने पगारी सुट्टी घेत असेल आणि सहाच महिने काम करत असेल तर हा जनतेचा टॅक्स रुपाने आलेला पैसा आहे. मी अर्थमंत्री असताना त्याबद्दल ज्यावेळी ही गोष्ट लक्षात आली त्यावेळी चर्चा केली होती की यामध्ये काहीतरी आपल्याला थोडासा बदल करण्याची गरज आहे परंतु बदल करत असताना संघटना, कामगार नेते यांना विश्वासात घेऊन मार्ग काढला पाहिजे परंतु त्याचवेळी जनतेलाही कळले पाहिजे की, यांना ३६५ दिवसात किती दिवस सुट्टया मिळतात असे माझे मत होते त्यात लक्षही घातले होते मात्र तोपर्यंत आमचे सरकार गेले याबाबत अजित पवार यांनी खंत व्यक्त केली.

# वीस वर्षांपूर्वी बंद पडलेल्या कारखान्यांच्या आधारे दिशाभूल

## खोटे पसरविणाऱ्यांपासून सावध राहण्याचे विश्वास पाठक यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सर्वाधिक वीजदरामुळे राज्यातील पोलाद कारखान्यांनी परराज्यात स्थलांतर केले असा दावा करताना काल ज्या कारखान्यांचा उल्लेख केला त्यांचे काम आठ ते तेवीस वर्षांपूर्वीच बंद झाले आहे. वीस वर्षांपूर्वी राज्यात बंद झालेल्या कारखान्यांच्या नावांचा वापर करून जनतेची दिशाभूल करणे निषेधार्ह आहे, अशी प्रतिक्रिया महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी बुधवारी व्यक्त केली. विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशने सावध रहावे आणि खोटे पसरविणाऱ्या व्यक्तींना आपला प्रतिष्ठीत मंच वापरू देऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले.
ते म्हणाले की, नागपूरमधील पत्रकार परिषदेच्या वृत्तात ज्या कंपन्यांच्या नावांचा उल्लेख केला आहे त्यांची महावितरणच्या रेकॉर्डमध्ये पडताळणी केली असता गणपती अलॉय अँड स्टील प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा वीजपुरवठा फेब्रुवारी २००२ मध्ये बंद झाला आहे. अर्थात त्या कारखान्याचे काम त्यावेळी बंद झाले. अशा प्रकारे बाबा मुंगिपा स्टील इंडस्ट्री या कारखान्याचा वीज पुरवठा जानेवारी २०१३ मध्ये बंद झाला आहे. ज्या कंपन्यांच्या नावांचा उल्लेख झाला त्या कंपन्यांचा महावितरणकडील वीजपुरवठा १९९९, २००२, २००३, २००६ साली बंद झाला आहे अर्थात त्या कारखान्यांचे राज्यातील काम त्यावेळी बंद झाले. या कंपन्यांकडे सव्वीस लाख ते पावणे तीन कोटी रुपयांचे बिलही थकीत आहे. अशा कारखान्यांच्या नावांचा हवाला देऊन स्टील इंडस्ट्री आता राज्याबाहेर चालली असा आभास निर्माण करणे चुकीचे आहे. के. सी. फेरो अँड रिरोलिंग मिल्स प्रायव्हेट लिमिटेडचे काम मात्र महाविकास आघाडी सरकार असताना ऑक्टोबर २०२१ मध्ये बंद झाले हे खरे आहे. राज्यातील कंपन्यांच्या सध्याच्या कामाबद्दलही दिशाभूल करण्यात आली आहे.

# युवकांना पोलीस, लष्कर, रहिवासी व उत्पन्न एका दिवसात द्या

## आ. बंब यांनी तहसीलदारांना दिले लेखी पत्र



आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** महाराष्ट्रामध्ये पोलीस भरती व मिलेक्ट्री भरतीची प्रक्रिया सुरू असल्याने तहसीलचे रहिवासी व उत्पन्न प्रमाणपत्रे अभावी विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असल्याने आ.प्रशांत बंब यांनी गंगापुरचे तहसीलदार यांना एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे की एका दिवसामध्ये उत्पन्न व रहिवाशी दाखला देण्यात यावे. तसेच दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की विद्यार्थ्यांना सध्या रहिवासी व उत्पन्नाचा दाखला मिळण्यास तहसील कार्यालयाकडून विलंब होत असल्याने विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे एका दिवसात उत्पन्न व रहिवाशी दाखला द्यावे व इतर कोणतेही कागदपत्रे देताना विलंब करु नये अशी मागणी आ.प्रशांत बंब यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# वैजापूरात चारचाकी शोरूमला आग; परिसरात एकच खळबळ



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील चारचाकी शोरूमला भीषण आग लागल्याची घटना आहे. सकाळच्या सुमारास घडली या घटनेमुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली होती. अग्निशामक दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्याने आग आटोक्यात आली आहे. या आगीत मोठे नुकसान झाल्याची चर्चा बघावयास मिळत आहे. वैजापूर शहरातील स्टेशन रोड परिसरातील सेंट मोनिका शाळेसमोर असलेल्या मारुती सुझुकी शोरुमला आग लागल्याची घटना सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली असून आग लागल्याचे लक्षात येताच नागरिकांनी आरडाओरड सुरू केली होती
माहिती मिळताच मोठ्या संख्येनं शहर वासियांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. सदरील घटनेची माहिती मिळताच डॉ. दिनेश परदेशी यांनी तत्काळ नगर परिषद वैजापूर येथील अग्निशामक दलास पाचारण केले,अग्निशामक दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्याने त्यांनी आग आटोक्यात आणली.



# अतिक्रमीत भागाचे अतिक्रमण नियमानुकुल करा

## धुळ्यात शिवसेनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** देवपुरातील एक दोन ठिकाणी सर्वेक्षण न करता संपूर्ण शहरातील सर्वेक्षण करून अतिक्रमण वसाहतीतील योग्य तो निर्णय घेऊन त्यांचे पुनर्वसन करा, अशी मागणी धुळे शिवसेना यांनी केली. महाराष्ट्र राज्य शासनाने अतिक्रमीत वसाहतींना मुलभूत सुविधा देता याव्यात या करीता रहिवास क्षेत्रातील अतिक्रमण नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला आहे. धुळे शहरात धुळे महानगरपालिकेच्या वतीने खाजगी एजन्सी नियुक्त करुन शहरातील काही झोपडपट्टी तसेच काही अतिक्रमीत भागाचे सर्वेक्षण देखील करण्यात आले आहे.

धुळे शहरात मोगलाई सह आझादनगर, जुने धुळे, जमनागिरी भिलाटी, फाशीपुल, मोहाडी, मिल परिसर, 40 गाव रोड, नगावबारी, गोंदूर रोड, नकाणे रोड, चितोड रोड, एकवीरा देवी मंदिर परिसर, विटा भट्टी, प्रभाग नगर आदी परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून गावठाण व शासकीय जागेत अतिक्रमीत रहिवासी राहतात. या भागातील नागरिक हे सर्व प्रकारचे कर महानगरपालिकेत भरतात. धुळे महानगरपालिकेने सध्या फक्त देवपूरातील 1-2 ठिकाणी अतिक्रमीत वसाहतींचे। सर्वेक्षण केले आहे. धुळे मनपा प्रशासन यात दुजाभाव करीत आहे. धुळे शहरातील मोगलाईसह इतर भागातील अतिक्रमणांचे देखील सर्वेक्षण करुन त्यांचे अतिक्रमण नियमानुकुल करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन आज शिवसेना महानगराच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली यावेळ शिवसेनेचे सहसंपर्क महानगरप्रमुख धीरज पाटील, डॉ. सुशील महाजन,संदिप सुर्यवंशी, भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, आण्णा फुलपगारे, महादु गवळी, छोटुभाऊ माळी, हिमांशु परदेशी, पिनुभाऊ सुर्यवंशी, कैलास मराठे, कृष्णा पालेकर, प्रविण साळवे, हेमाताई हेमाडे, जयश्री वानखेडे, सुरेश चौधरी, लक्ष्मण करंगळे यांच्यासह अतिक्रमण धारक उपस्थित होते.

# मेघा पाटील यांच्या 'विस्कटलेली चौकट' कादंबरीला पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**जत :** सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथील लेखिका मेघा पाटील यांच्या 'विस्कटलेली चौकट' या कादंबरीला अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील दोस्ती फाउंडेशनच्यावतीने देण्यात येणारा लक्षवेधी कादंबरी लेखन पुरस्कार जाहीर झाला आहे. श्रीरामपूर येथे 4 डिसेंबर रोजी पुरस्कार वितरण होणार आहे. लोककलावंत मजनुभाई शेख यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारासाठी मेघा रमेश पाटील यांच्या 'विस्कटलेली चौकट' या कादंबरीस 'लक्षवेधी कादंबरी लेखन' पुरस्कार जाहीर झाला आहे. 4 डिसेंबर रोजी श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे पुरस्कार वितरण होणार आहे. मेघा पाटील यांनी आतापर्यंत 'पुढचं पाऊल' (काव्यसंग्रह), 'आलकीचं लगीन' (कथासंग्रह) तसेच 'उंबरठ्यावरचा नाल', 'विस्कटलेली चौकट', 'शेतकरी नवरा', 'सुलवान' या चार कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांना साहित्य कलायात्री प्रकाशनकडून कविवर्य नारायण सुर्वे पुरस्कार, युगंधर काव्यभूषण, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, उत्कृष्ट साहित्य पुरस्कार यांसह गारगोटी, अमरावती, पंढरपूर, नागपूर, जामखेड, अहमदनगर, पुणे, सटाणा, औरंगाबाद येथील विविध संस्थांचे पुरस्कार मिळाले आहेत. तसेच विविध काव्य स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून बक्षिसे मिळवली आहेत. शेटफळे (आटपाडी) येथील कविसंमेलनात अध्यक्षस्थान भूषवले आहे. विविध कविसंमेलनात काव्य वाचन केले आहे.

# कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी एक फोन करताच महावितरणने गुंडाळली मोहीम

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. थकबाकीदार शेतकऱ्यांच्या शेती पंपाची वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सोयगाव महावितरणकडून तालुक्यात वीज तोडणीची मोहीम हाती घेण्यात आली होती. परंतु शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती आणि खरिपाच्या पिकांचे झालेले नुकसान यामुळे शेतकऱ्यांना मदतीची रक्कम मिळत नाही, तोपर्यंत वीज, पुरवठा खंडित करू नका, असे आदेश कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले. यानंतर त्वरित महावितरणने आपली वसुली मोहीम गुंडाळली. सोयगाव तालुक्यातील शेतकरी नुकसानीमुळे हातावर आलेला आहे. त्यातच रब्बीच्या हंगामासाठी खंडित करू नका असे बजावले. जळालेल्या रोहित्रांमुळे शेतकरी हताश झाला आहे. रोहित्र जळाल्यावर देयक भरूनही शेती पंपाचे रोहित्र तीन तीन महिने मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे केल्या. त्यावरून कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना थेट फोन वरून धारेवर धरून तातडीने शेतकऱ्यांना रोहित्र उपलब्ध करून घ्या व त्याबाबत अहवाल सादर करावा, अशा सूचना देऊन शेतकऱ्यांच्या खात्यावर अतिवृष्टीच्या नुकसानीचे व पीकविम्याची रक्कम खात्यावर वर्ग होईपर्यंत सोयगाव तालुक्यातील एकही रोहित्रावरील वीज जोडणी मिळाला आहे. यानंतर अधिकाऱ्यांनी सोयगाव तालुक्यातील महावितरणची वीज पंपाची वीज खंडित करण्याची मोहीम अवघ्या दहा मिनिटात आटोपती घेतली. अतिवृष्टीच्या नुकसानीची व पीकविम्याची मदतीची रक्कम खात्यावर वर्ग होताच शेतकऱ्यांनी वीज देयकाच्या थकीत रक्कमेपोटी पाच हजार रुपये महावितरणकडे तातडीने भरावी, असे आवाहन कृषिमंत्री सत्तार यांनी यावेळी केले. त्या आधी जर शेती पंपाचा वीज पुरवठा खंडित केल्यास थेट मला फोन करा, असेही ते म्हणाले. त्यामुळे सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अशी माहिती माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

# दिव्यांगांमधील अंतर कमी करण्यासाठी 'दिव्यांग रन शक्ती' चे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सर्वसामान्य समाजातील व्यक्ती आणि दिव्यांगांमधील अंतर कमी करणे हे उद्दिष्ट समोर ठेऊन नवजीवन सोसायटी फॉर रिसर्च ॲण्ड रिहबिलिटेशन ऑफ मेंटली हॅन्डीकॅपतर्फे 'दिव्यांग शक्ती रन २०२२' चे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवारी (दि. २७) सरस्वती भवनच्या प्रांगणात सकाळी ६ वाजता सुरू होईल. दिव्यांग रनचे हे चौथे वर्ष असून, यंदा शहरातील १८ शाळांनी यात सहभाग घेतला आहे. सर्वसामान्य नागरिकांनीही यात जास्तीस जास्त संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवावा, असे आवाहन नवजीवन सोसायटीच्या अध्यक्षा शर्मिला गांधी यांनी केले आहे.

नारेगाव येथील नवजीवन मतिमंद शाळेत शुक्रवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेत सोसायटीचे सचिव बी. एन. राठी, डॉ. रामदास अंबुलगेकर, आर. पी. दुसे, श्याम छाछरिया, सुषमा कुलकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका यामिनी काळे व अधीक्षक अभिजीत जोशी आदींची उपस्थिती होती.

यावेळी सोसायटीच्या अध्यक्षा शर्मिला गांधी यांनी सांगितले की, ५ सप्टेंबर १९८५ रोजी शहरात पहिल्यांदाच मतिमंद मुलांची नवजीवन ही शाळा सुरू झाली. या शाळेच्या माध्यमातून दिव्यांग मुलांसाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सन २०१७ पासून शाळेच्या माध्यमातून 'दिव्यांग रन' हा कार्यक्रम घेण्यात येत आहे. 'दिव्यांग रन' चे हे चौथे वर्ष असून, यंदा 'दिव्यांग शक्ती रन २०२२' चे २७ नोव्हेंबर रोजी होणार आहे. सरस्वती भवनच्या प्रांगणातून निराला बाजार मार्गे क्रांती चौक पोलिस ठाणे, सतीश पेट्रोल पंपापर्यंत व तेथून पुन्हा सरस्वती भवनचे प्रांगण, असा साडेतीन किलोमीटरचा रन असणार आहे. साडेतीन किलोमीटर पळण्याचे कोणालाही बंधन राहणार नाही. प्रत्येकाच्या क्षमतेनुसार रनचा आनंद घेऊ शकता आणि थकल्यास जागोजागी उभ्या असलेल्या मदत व्हॅन्समधून परत येऊ शकतात. हा रन फक्त दिव्यांगांचा नसून, यात सर्वसामान्य व्यक्ती ही सहभागी होऊ शकतो. यात समाजातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याचे शर्मिला गांधी यांनी सांगितले.



### दिव्यांगांना मिळणार सुविधा

दिव्यांगांची वैद्यकीय प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत जोडणे बंधनकारक, प्रत्येक दिव्यांगांसोबत संरक्षक म्हणून एक कार्यकर्ता असेल, गरजूंना व्हील चेअरचा वापर करता येईल, सर्वांसाठी रन रूटवर पिकअप व्हॅन उपलब्ध असतील, प्रत्येक दिव्यांगांची नोंद होणे सक्तीचे आहे, दिव्यांग रनरला वेळेत नाश्ता-पाणी वैद्यकीय मदत उपलब्ध असेल, सर्वांनी ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे.

### तेरा दिव्यांग खेळाडूंचा सत्कार

या दिव्यांग रनमध्ये अनेक औद्योगिक समूह सहभागी झाले आहेत. यासाठी त्यांचे सहकार्य ही लाभले आहे. यंदा साधारणत: तीन हजार जण या रनमध्ये सहभाग नोंदवतील, असा अंदाज आहे. यावेळचे वैशिष्ट्य म्हणजे औरंगाबाद शहराला अत्यंत अभिमान वाटावा, अशा शहरातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तेरा दिव्यांग खेळाडूंचा सत्कार कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in